| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक २० वा | सोमवार दिनांक २३ मार्च, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### वद्युत कॉपर केबल बंडलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत दि.२७.०१.२०२५ रोजी सोरोजीन कंपनीचे स्टोअर यार्ड मध्ये शेतशिवार शेकापुर ता. जि. धाराशिव येथील सोरोजीन कंपनीचे स्टोअर यार्ड मध्ये शेतशिवार शेकापुर येथुन दोन ज्युनिपर एन २५२३४४६, एन २५२३४४७ नेसल मधील ६२ विद्युत कॉपर केबल बंडल असा एकुण ९,६५,७०० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- अनिल मधुकर तिर्थकर, वय ४२ वर्षे, रा. रुईभर ता. जि. धाराशिव यांनी दि.२०.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) सह कलम १३६ वीज विद्युत अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून बांधुनठेवणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत मुसाविर रा. आझाद चौक कुरेशी गल्ली धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि. १९.०३.२०२६ रोजी खिरणीमळा धाराशिव येथे गोवंशीय जातीचे एकुण १० खालवड, वासरु व खोंड व एक जर्शी गाय, असा एकुण २,१७,०००किंमतीचे गोवंशीय जातीचे जनावरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या बांधुन ठेवलेले धाराशिव शहर पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(ब), सह ५(अ) पशु संरक्षण अधिनियम अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, रॉडने मारहाण : गुन्हा दाखल

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, बाबासाहेब सोमनाथ कसबे, राहुल सोमनाथ कसबे, नाना सोमनाथ कसबे, प्रियांका बाबासाहेब कसबे, शितल राहुल कसबे, सर्व रा. मोहा ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.२०.०३.२०२६ रोजी मोहा येथील समाज मंदीरासमोर मोहा येथे फिर्यादी नामे-अमोल मुकुंद कसबे, वय ३९ वर्षे, मोहा ता. कळंब जि. धाराशिव यांना नमुद व्यक्तींनी तु पुतळ्यासाठी व जयंतीसाठी पट्टी दिली नाहीस तुझा येथे यायचा काय संबंध नाही असे म्हणुन गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, रॉडने मारहाण करुन जखमी केले. परत आलास तर जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अमोल कसबे यांनी दि.२०.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे कळंब येथे भा.न्या.सं.कलम ११८(१),११५(२), ३५२, १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ३५१(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## युवा भारत जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद



धाराशिव, (जिमाका) मेरा युवा भारत कार्यालय व छत्रपती क्रीडा मंडळ,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धांचा उद्धाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अध्यक्षस्थानी आदित्य पाटील (कार्यकारी अधिकारी,आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ,धाराशिव) होते,तर प्रमुख उपस्थिती म्हणून अक्षय बिराजदार (तालुका क्रीडा अधिकारी) उपस्थित होते. मार्गदर्शन वक्ते म्हणून विश्वास खंदारे (तालुका क्रीडा अधिकारी,धाराशिव) तसेच मेरा युवा भारत कार्यालयाचे वैभव लांडगे,रविकांत सुरवसे,रोहिले गोविंद,ऋतुराज आगळे व छत्रपती क्रीडा मंडळाचे प्रा.प्रवीण बागल, रोहित चव्हाण,सुनील मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आदित्य पाटील यांनी युवकांना मोठ्या संख्येने क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन आपले कौशल्य सिद्ध करण्याचे व देशाचे नाव उज्वल करण्याचे आवाहन केले. त्यांनी क्रीडा क्षेत्रातील संधींचा लाभ घेऊन युवकांनी आपले भविष्य घडवावे,असेही सांगितले.

या स्पर्धांमध्ये उमरगा,लोहारा,भूम व परंडा तालुक्यांतील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.खो-खो, कबड्डी,१०० मीटर धावणे,गोळा फेक,लांब उडी व स्लो सायकलिंग अशा विविध क्रीडा प्रकारांमध्ये सुमारे २०० ते २५० खेळाडूंनी आपली उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सूर्यकांत कापसे व सिद्धेश्वर मते यांनी केले.हा कार्यक्रम उपसंचालक, मेरा युवा भारत,धाराशिव (महाराष्ट्र-गोवा) राहुल डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

## ईद निमित्त देशाच्या प्रगतीसाठी केली प्रार्थना, ना हिंदू ना मुसलमान मानवता हे एकच धर्म- आयुब मौलाना



मुरूम (डॉ. रामलिंग पुराणे ) देशात शांती कायम रहावे, मानवता हे एकच धर्म असून मानव नश्वर असून हे जीवन पुन्हा मिळणार नाही असे प्रतिपादन आयुब मौलाना यांनी केले. मुरूम येथील ईदगाह मैदानावर रमजान ईद निमित्त सामूहिक नमाज पठनाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले ना हिंदू ना मुसलमान मानवता हे एकच धर्म असून देशातील वातावरण शांतिमय राहण्यासाठी व तसेच देशाच्या, समाजाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी अल्लाह कडे प्रार्थना केली. चांगल्या विचारसरणीकडे मानवाचे दुर्लक्ष होत असून वाईट विचाराचे अनुकरण करण्याचा प्रमाण अधिक वाढत आहे, मानव आपला इमान आपला धर्म विसरत चालला असल्याचे खंत त्यांनी व्यक्त करून मानवता धर्म जोपासात इतरांबरोबर गद्दारी न करता इमानदारीने जगण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी मुरूम नगरीचे माजी नगराध्यक्ष रशिद शेख यांनी मनोगत व्यक्त करताना सारे मिळून मानवता धर्म पाळू या असा संदेश देत ईद निमित्त शुभेच्छा दिल्या. विधिवत नमाज पठणनंतर एकमेकांना गळाभेट घेऊन रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. नातेवाईक, मित्र परिवाराला ईद निमित्त शूरकुर्मा व गुलगुल्या आस्वाद घेऊन समाजबांधवात भाईचारा अबाधित राहावे, ग्रामीण भागातील समाज बांधवातील प्रेम कायम टिकून ईद परंपरा जोपासली. मुरूम शहरात एकंदरीत रमजान ईद शांततेत आणि राष्ट्राला पोषक असे एकात्मतेत सण उत्सहात साजरा करण्यात आला. ईदगाह मैदानसह शहरातील मस्जिद मध्ये ईद निमित्त नमाज पठण व शुभेच्छा देण्यासाठी गर्दी होती.

## कळंब आगाराला नवे नेतृत्व; प्रश्नांचा डोंगर समोर, विजयकुमार घोलप यांच्यासमोर मोठे आव्हान



कळंब (प्रतिनिधी)- कळंब येथील राज्य परिवहन आगारात प्रशासनाने मोठा बदल करत विद्यमान आगारप्रमुख एस. डी. खताळ यांची अक्कलकोट येथे बदली केली असून त्यांच्या जागी विजयकुमार घोलप यांची नव्या आगारप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दि. २० रोजी घोलप यांनी खताळ यांच्याकडून अधिकृतपणे पदभार स्वीकारत कळंब आगाराची सूत्रे हाती घेतली.

मात्र नव्या आगारप्रमुखांच्या स्वागतासोबतच कळंब आगारातील प्रश्नांचा डोंगर त्यांच्या समोर उभा ठाकला आहे. आगारातील अनेक बस नादुरुस्त अवस्थेत असून प्रवाशांना याचा थेट फटका बसत आहे. त्यातच यांत्रिक विभागातील कामकाजाची पद्धत, बस स्थानकातील घाण पाणी, अस्वच्छता आणि दुर्लक्षित सुविधा यामुळे आगाराची प्रतिमा मलिन झाली आहे. त्यामुळे नवीन नेतृत्व या साचलेल्या प्रश्नांवर

**नवीन आगारप्रमुख विजयकुमार घोलप यांनी कर्मचाऱ्यांना स्पष्ट संदेश देताना सांगितले की, सर्व वाहक-चालकांनी स्वतःची काळजी घेत कर्तव्य पार पाडावे. त्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करू. प्रवासी आणि प्रशासनाला सहकार्य करत कळंब आगाराचे उत्पन्न वाढवण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.**

कितपत आक्रमकपणे काम करते, याकडे कर्मचारी आणि प्रवाशांचे लक्ष लागले आहे.

कळंब बसस्थानकातील स्वच्छतेची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असताना, प्रवाशांच्या मूलभूत सुविधांबाबतही नाराजी वाढत आहे. नादुरुस्त बस, उशिरा धावणाऱ्या फेऱ्या आणि असुविधेमुळे प्रवाशांमध्ये संतापाचे वातावरण आहे. त्यामुळे विजयकुमार घोलप यांच्यासाठी हे पद केवळ पदभार नसून कार्यक्षमतेची खरी परीक्षा मानली जात आहे.

नियुक्तीनंतर विविध कर्मचारी संघटनांच्या वतीने विजयकुमार घोलप यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक बालाजी भारती, वाहतूक निरीक्षक निलेश जाधव, वाहतूक नियंत्रक सुशील हुंबे, प्रशांत नानजकर, नामदेव जगताप, चेतन गोसावी, शिवाजी बांगर, विलास जाधव, प्रभाकर झांबरे , महेश थोरबोले, सायास खराटे, अनिल बांगर, गणेश काळे, एजास शेख, गणेश गोरे, आर. के. जोशी, बळीराम कवडे, राहुल तोरगले आदी उपस्थित होते.

तसेच कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटनेच्या वतीने दोन्ही आगारप्रमुखांचा स्वागत व निरोप समारंभ घेण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष रवीकांत शिंदे, सचिव नितीन गायकवाड, कोषाध्यक्ष प्रशांत गायकवाड, प्रकाश पटेकर, लक्ष्मण जानराव, महेंद्र शेंडगे, विलास थोरात, डी. के. बीटे, अशोक रणदिवे, पांडुरंग गरड, सुनील जगताप तसेच महिला कर्मचारी पालके मॅडम, प्रियंका शिंदे, अनुराधा भोसले, पवार डी. एस., प्रशांत वेदपाठक आणि एम. बी. राऊत यांच्यासह मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते.

## नळदुर्ग पोलीसांनी १०,३८,२०,००० किंमतीचे हशीम ऑईल केले जप्त

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.१९.०३.२०२६ रोजी सहा पोलीस निरीक्षक सोळुंके, पोलीस उप निरीक्षक श्री. गिते हे पोलीस स्टाफ सह उपजिल्हा रुग्णालय नळदुर्ग ते तुळजापूर कडे जाणारे रोडवर नाकांबदी व कोबिंग ऑपरेशन करत असताना पोलीस पथकास एक संशयास्पद कार दिसून आल्याने त्यास थांबण्याचा ईशारा केला असता ती पळून जात असताना पोलीस पथकाने सदर गाडीचा पाठलाग करत होते. दरम्यान गाडीतील एका इसमानी रोडचे कडेला एक बॅग फेकुन दिल्याने पथकाने सदर बॅगची पाहणी केली असता बॅगमध्ये दहा प्लॅस्टीकच्या पिशव्यामध्ये हिरवट काळपट अवस्थेतील हशीम ऑईल सदृश्य अंमली पदार्थ वजन १०.३८२ कि. ग्रॅ एकुण १०,३८,२०,००० किंमतीचा हशीम ऑईल अमंली पदार्थ माल मिळून आल्याने सदर माल त्याचा सविस्तर पंचनामा करुन माल जप्त करुन ताब्यात घेउन हशीम ऑईल सदृश्य अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्या दोन अनोळखी इसमावर गुंगीकारक औषधीद्रव आणि मनोव्यावारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम कलम ८(सी),२०(B)(ii)(C), २५, २९ अन्वये गुरंन ११४/२०२६ असा गुन्हा नळदुर्ग पो.ठा. येथे २०.०३.२०२६ रोजी नोंदवला आहे.

सदरची कामगीरी ही पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. निलेश देशमुख, नळदुर्ग पोलीस ठाण्याचे प्रभारी- श्री. परि.सहा.सपोअ मेघना आय एन, सपोनि श्री. सोळुंके, आनंद कांगुने, पोउपनि- श्री. गिते, नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस पथकाने केली. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## लाडकी बहीण योजनेसाठी आधार संलग्नीकरण मोहीम : तालुकास्तरावर समाधान कक्ष स्थापन

धाराशिव (जिमाका) राज्यातील महिलांमध्ये निमियाचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे तसेच श्रमबल पाहणीनुसार पुरुषांची टक्केवारी ५९.१० टक्के तर स्त्रियांची टक्केवारी २८.७० टक्के असल्याची बाब लक्षात घेता महिलांच्या आर्थिक व आरोग्य परिस्थितीत सुधारणा करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने दि.२८ जून २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना राज्यात सुरू केली आहे.

या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व पात्र महिला लाभार्थ्यांनी अर्ज सादर केले असले तरी अनेक लाभार्थ्यांचे बँक खाते आधारशी संलग्न नसल्यामुळे त्यांना अद्याप योजनेचा लाभ त्यांच्या खात्यात जमा झालेला नाही. ही अडचण दूर करण्यासाठी तालुकास्तरावर एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयात समाधान कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

सर्व महिला लाभार्थ्यांनी संबंधित तालुक्यातील प्रकल्प कार्यालयात जाऊन समाधान कक्षातील कर्मचाऱ्यांकडून आपली समस्या दूर करून घ्यावी, तसेच ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेत मोबाईल व मूळ आधार कार्डची छायांकित प्रत घेऊन स्वतः उपस्थित राहून आधार संलग्नीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी,असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व बँकांनीही ही प्रक्रिया मोहिम स्वरूपात राबवून आधार संलग्नीकरण पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या कार्यात अंगणवाडी पर्यवेक्षिका व सेविकांनी संबंधित महिला लाभार्थ्यांना बँकेत जाणे व आधार संलग्नीकरण करण्यासाठी आवश्यक सहकार्य करावे,असेही सांगण्यात आले आहे.तसेच, काही कारणास्तव ई-केवायसी (श-घधउ) प्रलंबित असल्यास किंवा चुकीची झाल्यास संबंधितांनी तालुक्याच्या प्रकल्प कार्यालयात जाऊन मार्गदर्शन घेऊन दि.३१ मार्च २०२६ पर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

यामुळे लाभार्थ्यांच्या खात्यावर योजनेचा लाभ विनाविलंब जमा होईल,असे आवाहन अध्यक्ष,जिल्हा परिषद व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद धाराशिव यांनी केले आहे.

## आदिवासी धनगर साहित्य संमेलन चांदवड येथे होणार- प्रा. डॉ. टकले



धाराशिव (प्रतिनिधी)- पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीचे औचित्य साधून सहावे आदिवासी धनगर साहित्य संमेलन नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथील होळकर वाड्यात ११ व १२ एप्रिल रोजी होणार असल्याची माहिती संमेलनाचे संस्थापक प्रा. डॉ. अभिमन्यू टकले यांनी दिली.

शुक्रवार दि. २० मार्चच्या सायंकाळी धनगर साहित्य संमेलन नियोजन बैठक धाराशिव येथे घेण्यात आली. त्याप्रसंगी डॉ. टकले बोलत होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूरचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर राहणार असून, संमेलनाचे उद्धाटन विधानसभेचे सभापती राम शिंदे, आमदार गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून खासदार रामभाऊ वडकुते, पत्रकार सुभाष बोंद्रे, बाळासाहेब पाटील, जेष्ट पत्रकार उत्तम कांबळे, मध्यप्रदेशचे मंत्री सैतानसिंग पाल उपस्थित राहणार आहेत. संमेलनात धनगर जमात व राजकीय स्थिती, चांदवडच्या इतिहासात होळकरांचे योगदान आदी चर्चा सत्र होणार आहे. त्याप्रमाणे कवी संमेलनासाठी देशभरातून कवी येणार आहेत. संमेलनाचा समारोप नाशिकचे पोलिस आयुक्त बाळासाहेब वाघमोडे, प्रा. यशपाल भिंगे, माजीमंत्री बच्चू कडू यांच्या उपस्थितीत होणार आहे.

या बैठकीस माजी नगराध्यक्ष दत्ता बंडगर, जिल्हा बँकेचे माजी संचालक भारत डोलारे, जेष्ठ पत्रकार उज्वलकुमार माने, कवित्री जयश्री तेरकर, ड. प्रिया माने, सुभाष मैदांड, डॉ. संजय सोनटक्के, संतोष वतने, हरिश्चंद्र मैदांड, प्रा. सोमनाथ लांडगे, जेष्ठ पत्रकार राजाभाऊ वैद्य, बिभीषण लोकरे, ड. नामदेव तेरकर, अर्चना मैदांड, राजू मैदांड, मल्हारी नवले,संकेत पाटील, बिभीषण हजारे आदी उपस्थित होते.

## २८९ कारवाया करुन २,७२,००० 'तडजोड शुल्क' वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२० मार्च रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २८९ कारवाया करुन २,७२,००० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## अंधश्रद्धेला बळी पडलेली सुशिक्षित मंडळी!...

भारतीय एवढे महान आहोत की, आपल्याला मोठ-मोठी संत लाभली आहेत. संत गाडगेबाबा असोत किंवा महात्मा ज्योतिबा फुले, त्यांच्यापेक्षा संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर असतील अशा अनेक महात्म्यांनी अंधश्रद्धेला बळी पडू नका असा जाहिर संदेश दिला. तरी याकडे दुर्लक्ष केले. आज कॅप्टन खरात याला बळी पडलेली मंडळी कोण आहे? याचा विचार केला तर अनेक बाबी कळून येतील. शिकलेली, चांगल्या घरातील मंडळी बळी पडल्याचे दिसून येते. अत्त्याचारास बळी पडल्या आहेत. मुळात भारतीयांना ईश्वरच कळाला नाही. ईश्वर कोठे आहे. तो मागणारा नाही, खाणारा नाही जर तो भक्तांना देणारा व खाऊ घालणारा आहे. एका कणसास शेकडो दाणे निर्माण कराणारा आहे, सुर्य, चंद्र, हवा किंवा पाणी निर्माण करणारा ईश्वर आहे. आज जाती, पंथात केवळ अंधश्रद्धा चाललेली आहे. त्याला अंधश्रद्धाळू बळी पडत आहेत. कॅप्टन खरात यांनी दुकानदारी सुरू केली. त्याने काही कोणाला बोलावून अत्याचार, दुराचार केला नाही, जी बळी पडलेली मंडळी स्वत: होवून आले. अंधश्रद्धेच्यापोटी बळी पडलेली मुर्ख मंडळी पश्चातापात बुडाली असणारा! त्यामुळे खरात पेक्षा मुर्ख लोकांना डोके गहाण ठेवून उचललेले पावुल आहे. त्यापेक्षा ही या घटनेस नागरिक जबाबदार आहेत. सरकार सुद्धा तेवढेच जबाबदार धरले पाहिजे. केवळ कॅप्टन खरात याचे पहिले कृत्य आहे असे नाही. आपल्या राज्यात किंबहून देशात असे भोंदू होवून गेले. काही जेलची हवा खात आहेत तरी नागरिकांचे डोळे उघडले नाहीत. हा खरात कोण होता व याची कल्पना शेजाऱ्यास का नसावी? किंवा त्याचे वाढते प्रस्थ कशामुळे निर्माण झाले असावे याचा विचार केला पाहिजे. हा थाकथित अंकशास्त्रज्ञ अशोक खरात याला बलात्काराच्या गंभीर आरोपांवरून अटक झाल्यानंतर या प्रकरणात नवनवीन दावे समोर येत आहेत. धार्मिक श्रद्धा, दैवी शक्ती आणि मंत्रतंत्राच्या नावाखाली महिलांचा विश्वास संपादन करून अत्याचार केल्याचा आरोप त्याच्यावर होत आहे. दरम्यान, त्याच्या अटकेनंतर आता राजकीय वर्तुळात वेगळ्याच चर्चांना सुरुवात झाली असून या प्रकरणाला आणखी एक नवा आयाम मिळाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी गंभीर मागणी करत, खरातचा संबंध उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाताशी आहे का, याचा तपास व्हावा असे म्हटले आहे. त्याचवेळी शरद पवार गटाचे प्रवक्ते सुनील माने यांनी अजित पवार यांच्या मुंबईतील देवगिरी बंगल्याबाहेर तसेच बारामतीतील निवासस्थानाबाहेर जादूटोण्याशी संबंधित वस्तू सापडल्याचा दावा केला आहे. या पार्श्वभूमीवर या कृत्यामागे अशोक खरात किंवा त्याच्याशी संबंधित व्यक्तींचा हात आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. या दाव्यांमुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. अजित पवार यांच्या बंगल्याबाहेर आढळलेल्या वस्तूंचा आणि खरातचा काही संबंध आहे का? त्याने कोणत्याही प्रकारची काळी जादू केली होती का? अशा चर्चांना उधाण आले आहे. मात्र, या सर्व दाव्यांची अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नसून, याबाबत सखोल तपासाची मागणी जोर धरत आहे. दरम्यान, अशोक खरातविरुद्ध नाशिकमधील सरकारवाडा पोलिस ठाण्यात एका ३५ वर्षीय महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुंगीकारक औषध देऊन अत्याचार केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला असून, १८ मार्च रोजी पहाटे गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील श्री ईशान्येश्वर मंदिर ट्रस्टचा अध्यक्ष असलेला खरात मर्चंट नेव्हीतून निवृत्त आहे. अंकशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्धी मिळवलेल्या या व्यक्तीकडे अनेक राजकीय नेते, उद्योजक आणि सेलिब्रिटी मार्गदर्शनासाठी जात असल्याचेही सांगितले जाते. मात्र, त्याच्यावर झालेल्या गंभीर आरोपांमुळे आणि नव्याने समोर आलेल्या दाव्यांमुळे राज्यात मोठी खळबळ निर्माण झाली आहे. त्याने महिलावर अत्याचार केले, घृणास्पद कार्य केले ते अतिषय निंदणीय आहे. बुवा तेथे बाया असा आपल्या पुर्वजांनी संदेश दिला आहे. वास्तविक देशात शिक्षणाचे प्रमाण वाढते आहे. सतत संशोधनाची वृत्ती आहे. गुगळचा वापर होतो. कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर होतो. तरी अनेकजन अशा भोंदूस बळी का पडताता? मुळात अंधश्रद्धा पसरवली आहे. त्याला खत पाणी घातले जात आहे. आपल्या महात्म्यांनी श्रद्धेला महत्त्व दिले आहे अंधश्रद्धेला नाही हे लक्षात घेतले पाहिजे. जेवढा दोषी खरात आहे तेवढेच त्याच्याशी सर्व संबंधित आहेत, तेही जनतेच्या नजरेतून दोषी ठरतात, त्यांच्यावर गुन्हा का दाखल होवू नये? अतिषय निंदनिय प्रकार आहे. वृत्तपत्रातून गतवर्षी या भोंदूचे प्रकरण छापले होते, आज वृत्तापत्रातून येणाऱ्या वृत्ताकडे दुर्लक्ष होत आहे. दखल घेतली जात नाही हे दुर्दैवाने म्हणावे लागते. पुर्वी स्थानिक वृत्तापत्रातून बातमी छापली की, लक्ष दिले जात होते, याचा प्रत्यय आम्हाला आला आहे. काही वर्षापुर्वी बातमीची उखल घेतली लातूरचे जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाठीमागील नव्याने बांधकाम चालू आहे त्याला वापरात येणाऱ्या वीटा खराब आहेत, सकाळी आकराच्या सुमारात कलेक्टर स्वत: आले त्यांनी वीट पाण्यात टाकली तर ती क्षणात विरगली, त्यांनी ते काम बंद पाडले. असे आलिकडे होत नाही. शासन किंवा प्रशासनला वेळ नाही असे दु:खाने म्हणावे लागते. वास्तविक शासन व प्रशासन हे अशा घटनेस आळा घालण्यासाठी काही नागरिकांशी संबंध ठेवले पाहिजे, याला खबऱ्या असे आजही म्हणतात. पुर्वी छत्रपतीं शिवाजी राजेंच्या काळात होते. सध्याला तक्रार दिल्यावर किंवा पिडीत पुढे आल्यावर नोंद घेतली जाते. शासन व प्रशासनासनाचा ही ढिलाई नव्हे काय? त्यामुळे खरात सारख्यांचे फावले जाते. अनेक स्वयं घोषीत संत जेल मध्ये आहेत तर काही जमीनवर आहेत. याला जबाबदार कोण? त्यामुळे खरात यांना अटक झाली आहे. सखोल चौकशीची गरज आहे. तो कायद्याच्या कचाट्यातून सुटता कामा नये.. असा कायद्याचा फास आवळण्याची गरज आहे. आज विज्ञान एवढे पुढे गेले असताना भोंदूला बळी पडले जाते हे दुदैव आहे. त्यामुळे प्रशासन व शासन सतत डोळे उघडे ठेवून चालले पाहिजे. समाजात वाईट प्रकार होत असतील तर त्यांनी वेळीच लक्ष दिले पाहिजे. आज ज्या महिलां बळी पडल्या त्यांना त्यांचे जीवन परत येणार नाही. पुन्हा अशा घटनेला बळी पडता कामा नये. अंधश्रद्धेला बळी पडू नये या साठी दक्ष राहिले पाहिजे.

# श्रद्धेच्या आड दडलेले अंधश्रद्धेचे वास्तव : कायद्याची अंमलबजावणी आणि जबाबदारीचा प्रश्न

महाराष्ट्र ही सामाजिक प्रबोधनाची, विवेकनिष्ठ विचारांची आणि परिवर्तनवादी चळवळींची भूमी म्हणून देशात एक वेगळी ओळख निर्माण करून आहे. महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक इतिहासात अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, स्त्रीदमन आणि अन्याय यांविरुद्धचा लढा हा केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष कृतीतून उभा राहिलेला दिसतो.महात्मा ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक विचार मांडत समाजातील अज्ञानाला आव्हान दिले, सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया घालत अंधश्रद्धा आणि स्त्रीदमनाला प्रत्यक्ष धक्का दिला, राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक न्यायाच्या धोरणांद्वारे समतेचा मार्ग मोकळा केला, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचार आणि मानवी सन्मान या मूल्यांना घटनात्मक अधिष्ठान दिले. या वैचारिक परंपरेतूनच पुढे अंधश्रद्धेविरोधी चळवळी उभ्या राहिल्या आणि त्यातून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अस्तित्वात आला.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा म्हणजे केवळ कायदेशीर चौकट नसून तो समाजाच्या विवेकनिष्ठतेचा आणि प्रबोधनपर भूमिकेचा पुरावा आहे. श्रद्धेच्या नावाखाली होणाऱ्या भोंदूगिरीला, फसवणुकीला आणि शोषणाला थांबवण्यासाठी हा कायदा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. परंतु, वास्तवातील काही घटनांमुळे हा प्रश्न उभा राहतो की, कायदा असूनही अशा प्रकारच्या घटना का घडतात? विशेषतः महिलांचे श्रद्धेच्या नावाखाली होणारे लैंगिक शोषण हे केवळ गुन्हेगारी प्रकरण नसून ते समाजाच्या मानसिकतेवर, प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि सत्तेच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामधील भेद समजून घेणे ही या चर्चेची पहिली पायरी आहे. श्रद्धा ही मानवी जीवनाचा सकारात्मक भाग आहे. ती व्यक्तीला मानसिक आधार देते, जीवनातील संकटांमध्ये धैर्य देते आणि नैतिक मूल्यांची जपणूक करते. परंतु, जेव्हा श्रद्धा विवेकशून्य बनते, प्रश्न विचारण्याची क्षमता हरवते आणि ती अंधानुकरणात परिवर्तित होते, तेव्हा ती अंधश्रद्धा बनते. अंधश्रद्धा ही व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर, विचारशक्तीवर आणि सन्मानावर आघात करते. ती अनेकदा भीती, असुरक्षितता आणि अज्ञान यांच्यापासून जन्म घेते आणि त्यातून शोषणाला खतपाणी मिळते.

अलीकडील काळात काही घटनांमध्ये श्रद्धेच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे आरोप समोर आले आहेत. या घटना केवळ व्यक्तीगत गुन्ह्यांच्या चौकटीत मर्यादित नसून त्या समाजातील अंधश्रद्धेच्या खोलवर रुजलेल्या मानसिकतेचे प्रतीक आहेत. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःला दैवी शक्ती असलेली म्हणून सादर करते, चमत्कारांचे दावे करते आणि लोकांच्या समस्यांवर 'दैवी उपाय' सुचवते, तेव्हा काही लोक त्या व्यक्तीवर आंधळा विश्वास ठेवतात. या विश्वासाचा गैरफायदा घेत काही भोंदू लोक महिलांचे मानसिक, आर्थिक आणि लैंगिक शोषण करतात.

महिलांच्या संदर्भात अंधश्रद्धेचा प्रश्न अधिक गंभीर ठरतो. पितृसत्ताक समाजरचना, शिक्षणाचा अभाव, आर्थिक अवलंबित्व आणि सामाजिक दबाव यामुळे अनेक महिला अशा भोंदू व्यक्तींच्या जाळ्यात अडकतात. त्यांच्या वैयक्तिक समस्या; जसे की आरोग्याच्या अडचणी, कौटुंबिक ताणतणाव, संततीप्राप्तीचे प्रश्न यावर उपाय शोधताना त्या अशा लोकांकडे वळतात. हीच परिस्थिती शोषणाला कारणीभूत ठरते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा या कायद्याने अशा प्रकारच्या कृत्यांना स्पष्टपणे गुन्हा घोषित केले आहे. जादूटोणा, बुवाबाजी, खोटे चमत्कार, फसवणूक, तसेच शारीरिक आणि मानसिक छळ यांना या कायद्यात बंदी घालण्यात आली आहे. तरीही, अशा घटना घडत राहतात, याचा अर्थ कायद्याच्या अंमलबजावणीत गंभीर त्रुटी आहेत.

'कायद्याची अंमलबजावणी कोणी करायची?' हा प्रश्न येथे केंद्रस्थानी येतो. सैद्धांतिकदृष्ट्या, ही जबाबदारी पोलीस, प्रशासन आणि न्यायव्यवस्था यांच्यावर असते. परंतु, या यंत्रणा स्वतंत्र आणि निष्पक्ष असल्या पाहिजेत. जर त्यांच्यावर राजकीय दबाव असेल किंवा त्यांच्यात प्रामाणिकतेचा अभाव असेल, तर त्या प्रभावीपणे कार्य करू शकत नाहीत.

याठिकाणी सत्ताधाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. जर सत्तेतील काही लोकच अशा भोंदू व्यक्तींना संरक्षण देत असतील, त्यांच्याविरोधात कारवाई करण्यास टाळाटाळ करत असतील किंवा राजकीय फायद्यासाठी त्यांचा वापर करत असतील, तर ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक ठरते. अशा वेळी केवळ कायद्याचा अपमान होत नाही, तर लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासही ढासळतो.



'याला जबाबदार कोण?' या प्रश्नाचे उत्तर बहुआयामी आहे. सर्वप्रथम, जबाबदारी त्या व्यक्तीची आहे जी अंधश्रद्धेचा वापर करून शोषण करते. दुसरे म्हणजे, त्या यंत्रणांची जबाबदारी आहे ज्या अशा कृत्यांना रोखण्यात अपयशी ठरतात. तिसरे म्हणजे, सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे, ज्यांनी कायद्याची निष्पक्ष अंमलबजावणी सुनिश्चित करणे अपेक्षित आहे. आणि शेवटी, समाजाचीही जबाबदारी आहे, जो अशा व्यक्तींना अंधश्रद्धेने पूजतो.

समाजातील अंधश्रद्धा ही केवळ अज्ञानामुळे निर्माण होत नाही. ती भीती, असुरक्षितता आणि आशेच्या शोधातूनही निर्माण होते. त्यामुळे, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत. समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे, शिक्षणाचा प्रसार करणे आणि लोकांना तर्कशुद्ध विचार करण्याची सवय लावणे आवश्यक आहे.

महिलांच्या सशक्तीकरणालाही येथे विशेष महत्त्व आहे. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक जागरूकता यामुळे महिलांना अशा शोषणापासून वाचवता येऊ शकते. त्याचबरोबर, त्यांना योग्य मार्गदर्शन आणि आधार मिळवून देणेही आवश्यक आहे.

माध्यमांची भूमिका देखील अत्यंत महत्त्वाची आहे. माध्यमांनी अशा घटनांचा निष्पक्षपणे पर्दाफाश केला पाहिजे आणि समाजामध्ये जागरूकता निर्माण केली पाहिजे. सामाजिक संघटना आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळींनीही अधिक सक्रिय भूमिका घेणे आवश्यक आहे.

शेवटी, हा प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर समाजाच्या आत्मपरीक्षणाचा आहे. आपण खरोखरच पुरोगामी आहोत का? की आपण अजूनही अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकलेले आहोत? जर श्रद्धेच्या नावाखाली शोषण होत असेल आणि आपण त्याकडे दुर्लक्ष करत असू, तर आपली पुरोगामी ओळख ही केवळ दिखावा ठरते.

महाराष्ट्राच्या प्रबोधनपर परंपरेला खऱ्या अर्थाने जपायचे असेल, तर केवळ कायदे बनवून चालणार नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी, समाजामध्ये विवेकाची रुजवणूक आणि प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. तेव्हाच अंधश्रद्धामुक्त, न्याय्य आणि खऱ्या अर्थाने पुरोगामी महाराष्ट्र घडू शकतो.

**डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# सांदिपनी इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निकमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा साजरा



**लातूर/प्रतिनिधी** :लातूर शहरापासून जवळच असलेल्या कोळपा येथील सांदिपनी टेक्निकल कॅम्पस फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निक महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा युगांतर २०२६ दयानंद सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या स्नेहसंमेलन सोहळ्याचे उदघाटन मराठी सिने अभिनेत्री सिमरन खेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, उपाध्यक्ष डॉ. अनिल राठी , विजय हिबारे, इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्राचार्या डॉ. संजीवनी कुलकर्णी, पॉलिटेक्निकच्या प्राचार्या वाकडे शितल, प्रबंधक बडगीरे उध्दव आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या सर्व विद्या शाखांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करणारे प्रा. डॉ. आशिष अग्रवाल, चोपने अजय व रुपाली शिंदे यांचा संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. अनिल राठी यांनी महाविद्यालयातील सर्व गुणवंत विद्यार्थी व प्राध्यापक वृंदांचे कौतुक केले. अल्पावधीतच महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात निर्माण केलेली ओळख पाहून समाधान व्यक्त करून त्यांनी भविष्यात सांदिपनी महाविद्यालय शिक्षण क्षेत्रात यापेक्षाही अधिक भरारी घेईल असा विश्वास व्यक्त केला.

आपल्या उदघाटनपर मनोगतात अभिनेत्री सिमरन खेडकर यांनी आपण स्वतः लातूरची कन्या असल्याने या सोहळ्यास आवर्जून उपस्थित राहण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निक अशा विविधतेने नटलेले हे प्रगतीपथावरील महाविद्यालय पाहून आपल्याला अतिशय आनंद झाल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंजिनिअरिंगच्या प्राचार्या डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी संस्थेच्या प्रगतीविषयी सविस्तर माहिती दिली. आपल्या संस्थेच्या १५ वर्षाच्या कार्यकाळात झालेल्या शैक्षणिक प्रगतीबद्दल संस्थेचे कार्यकारी मंडळ तसेच पालकवर्गही समाधान व्यक्त करतात हे पाहून सर्व स्टाफही अधिक कार्यक्षमतेने काम करत असल्याचे त्या म्हणाल्या. वर्ष २०२४ - २५ मध्ये संस्थेमध्ये शिक्षण घेतलेल्या एकूण ९५ टक्के विद्यार्थ्यांची कॅम्पसमध्ये निवड झाली असून यावर्षीही ८० टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. अजूनही यावर्षी कॅम्पसमध्ये निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ अपेक्षित आहे. पालकांनी आपल्या पाल्यांच्या भवितव्याबद्दल कोणतीही चिंता करू नये, असेही त्यांनी आश्वस्त केले.

कार्यक्रमास स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. बी.एम. सातपुते , प्रा. व्ही.एम. गीर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. एम.डी. लोमटे,प्रा. पी.जे. गरड यांसह सर्व विभाग प्रमुख , प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी अमन गुट्टे, अभय पिंपळे, चिन्मय गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनाली कुलकर्णी, प्रा.वेदपाठक यांनी आभार प्रदर्शन प्रा. सातपूते यांनी केले.

## माणगाव परिषद : सामाजिक क्रांतीचा एल्गार

भारतीय समाजव्यवस्थेतील जातीभेदाच्या भिंती पाडण्यासाठी आणि शोषित-वंचितांना आत्मभान मिळवून देण्यासाठी ज्या काही मोजक्या ऐतिहासिक घटना घडल्या, त्यात 'माणगाव परिषद' हे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. २१ आणि २२ मार्च १९२० रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील माणगाव या छोट्याशा गावात ही परिषद संपन्न झाली. या परिषदेला आता १०६ वर्षे पूर्ण होत आहेत. ही परिषद केवळ एक राजकीय सभा नव्हती, तर ती भारतीय लोकशाहीच्या आणि सामाजिक समतेच्या प्रवासातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा होता आणि तो पुढे एक सामाजिक क्रांतीचा एल्गार ठरला.

दोन युगपुरुष एकाच मंचावर : शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर

माणगाव परिषदेचे सर्वात ऐतिहासिक आणि रोमांचक वैशिष्ट्य म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन युगपुरुषांचे एकाच मंचावर येणे. त्यावेळी डॉ. आंबेडकर हे अवघ्या २९ वर्षांचे तरुण होते आणि नुकतेच विदेशातून उच्च शिक्षण घेऊन परतले होते. राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्यातील अफाट बुद्धिमत्ता, तळमळ आणि नेतृत्वगुण ओळखले होते. महाराजांनी स्वत: पुढाकार घेऊन डॉ. आंबेडकरांना या परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवण्याची विनंती केली. एका बाजूला सत्तेचा आणि अधिकाराचा वापर लोककल्याणासाठी करणारे 'लोकराजा' आणि दुसऱ्या बाजूला पददलितांचे कैवारी बनलेले 'विद्वान' बाबासाहेब, असा हा अभूतपूर्व संगम होता.

**ऐतिहासिक भविष्यवाणी आणि नेतृत्वाचा उदय**

या परिषदेत राजर्षी शाहू महाराजांनी केलेले भाषण भारतीय इतिहासात अजरामर झाले आहे. महाराजांनी उपस्थितांना संबोधित करताना म्हटले होते, तुम्हाला तुमचा नेता (डॉ. आंबेडकर) मिळाला आहे. माझी खात्री आहे की, ते केवळ तुमचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे नेते होतील. ही केवळ स्तुती नव्हती, तर एका द्रष्ट्या राजाने भविष्यातील महामानवावर ठेवलेला विश्वास होता. शाहू महाराजांनी जाहीरपणे डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व मान्य केले आणि समाजाला त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले. या एका वाक्याने डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वावर अधिकृत शिक्कामोर्तब झाले आणि इथूनच एका नव्या पर्वाची सुरुवात झाली.

**परिषदेचे ठराव आणि सामाजिक परिणाम**

माणगाव परिषदेत केवळ भाषणे झाली नाहीत, तर सामाजिक परिवर्तनासाठी ठोस ठराव मंजूर करण्यात आले. त्यात प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होता:

१. अस्पृश्यता निवारण: समाजात रुजलेली अस्पृश्यतेची अनिष्ट प्रथा मुळापासून उपटून टाकणे.

२. शिक्षण प्रसार: शोषित वर्गातील मुला-मुलींना दर्जेदार शिक्षण मिळवून देणे, कारण शिक्षण हेच प्रगतीचे साधन आहे.

३. राजकीय अधिकार: दलितांना विधिमंडळात आणि प्रशासनात योग्य प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी मागणी करणे.

४. स्वाभिमानाची जागृती: 'बहिष्कृत' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजाने स्वत:चा न्यूनगंड सोडून देऊन आत्मसन्मानाने जगण्यास शिकणे.

या परिषदेने डॉ. आंबेडकरांच्या 'मूकनायक' या वृत्तपत्रासाठी देखील मोठे बळ दिले. शाहू महाराजांनी या वृत्तपत्राला आर्थिक मदत केली होती, जेणेकरून वंचितांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचू शकेल.

**माणगाव: एक सन्मानभूमी**

आज माणगाव ही भूमी 'सन्मानभूमी' म्हणून ओळखली जाते. दरवर्षी वर्धापन दिनाचे औचित्य साधून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि 'बार्टी' पुणे यांच्या वतीने भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यावर्षी २१ मार्च रोजी 'क्रांतीचा साक्षीदार' हे एकपात्री नाटक, विविध मान्यवरांची व्याख्याने आणि २२ मार्च रोजी प्रसिद्ध गायक उत्कर्ष शिंदे व कबीर नाईकनवरे यांचा प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. ही आयोजने केवळ उत्सवी नसून, नव्या पिढीला महापुरुषांच्या विचारांची ओळख करून देण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.

माणगाव परिषद ही समतेची, बंधुत्वाची आणि न्यायाची सुरुवात होती. या परिषदेने शिकवले की, जेव्हा सत्ता (शाहू महाराज) आणि ज्ञान (डॉ. आंबेडकर) एकत्र येतात, तेव्हा मोठी क्रांती घडते. आज १०६ वर्षानंतरही जातीभेदाची आव्हाने आपल्यासमोर आहेत. अशा वेळी माणगाव परिषदेचा हा वारसा आपल्याला प्रेरणा देतो. महापुरुषांच्या विचारांना केवळ अभिवादन न करता, ते आचरणात आणणे हीच या ऐतिहासिक दिनाची खरी फलश्रुती ठरेल.

**- सचिन अडसूळ,**
**९०४९९८७२९८**

०००००००००००००००००००००००००००

## निसर्ग संवर्धनाचा 'सागरेश्वर पॅटर्न'

२१ मार्च हा दिवस संपूर्ण जगभरात 'जागतिक वनीकरण दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकारातून साजरा होणाऱ्या या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे वनांचे महत्त्व समजावून सांगणे, जैवविविधतेचे संरक्षण करणे आणि ढासळणारा पर्यावरणीय समतोल टिकवण्यासाठी मानवाला प्रेरित करणे हा आहे. आजच्या काळात जेव्हा सिमेंटची जंगले वाढत आहेत, तेव्हा सांगली जिल्ह्यात वसलेले यशवंतराव चव्हाण वन्यजीव सागरेश्वर अभयारण्य हे निसर्ग संवर्धनाचे जणू प्रत्यक्ष आणि आदर्श उदाहरण म्हणून जगासमोर उभे आहे.

सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य हे निसर्गसौंदर्य, सांस्कृतिक वारसा आणि मानवी परिश्रमांचा एक अद्भुत संगम आहे. या अभयारण्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, इतर अभयारण्यांप्रमाणे हे नैसर्गिकरीत्या विकसित झालेले नाही. तर ते परिसरातील लोकांनी एकत्र येत निर्माण केलेले भारतातील पहिले मानवनिर्मित अभयारण्य आहे. एकेकाळी या परिसरात केवळ उघड्या-बोडक्या टेकड्या आणि ओसाड माळरान होते. मात्र, वृक्षमित्र धों. म. मोहिते यांनी आपल्या अथक प्रयत्नातून या ओसाड माळरानाचं नंदनवनात रूपांतर करण्याची किमया केली.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्थानिक नागरिकांना सोबत घेऊन त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण वृक्षलागवडीमुळे आज येथे १०.८७ चौरस किलोमीटरवर पसरलेली समृद्ध वनसंपदा निर्माण झाली आहे.

कडेगाव, वाळवा आणि पलूस या तीन तालुक्यांच्या संगमावर वसलेले हे अभयारण्य आज निसर्गप्रेमी आणि वन्यजीव निरीक्षकांसाठी एक नंदनवन ठरत आहे. येथे गवताळ टेकड्या, कोरड्या पानगळीचे जंगल आणि मोकळी कुरणे पाहायला मिळतात. विशेष म्हणजे, इतर अभयारण्यांप्रमाणे येथे कोणतेही बारमाही नैसर्गिक जलस्रोत नाहीत. असे असूनही, मानवी नियोजनाच्या जोरावर येथे चिंच, कडुलिंब, निलगिरी, बाभूळ, साग, खैर, पळस आणि बहावा अशा अनेक वृक्षप्रजातींची यशस्वी जोपासना करण्यात आली आहे.

या हिरव्यागार आच्छादनामुळेच आज येथे वन्यजीवांचा मोठा राबता आहे. सांबर, काळवीट, चितळ आणि मंटजॅक (रानमांजर) यांसारख्या हरणांच्या विविध प्रजाती येथे मुक्तपणे वावरताना दिसतात. त्यांच्यासोबतच रानडुक्कर, कोल्हा, तरस आणि साळींदर यांसारख्या प्राण्यांचे दर्शन वन्यजीव निरीक्षणाचा अनुभव अधिक रोमांचक बनवते. केवळ प्राणीच नव्हे, तर रंगीबेरंगी मोर आणि विविध प्रकारचे पक्षी पक्षीनिरीक्षकांना भुरळ घालतात. या परिसरात विविध प्रकारचे सर्प आणि फुलपाखरांचीही मोठी संख्या असून, ते या नाजूक पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत करतात. पावसाळ्यात जून ते सप्टेंबर - ऑक्टोबर पर्यत निसर्गाचे सौंदर्य पहाण्यासाठी भेट देण्यासाठी सोयीस्कर काळ आहे.

आज वाढती लोकसंख्या, शहरीकरण आणि जंगलतोड यामुळे हवामान बदल आणि तापमान वाढ यांसारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत सागरेश्वर अभयारण्याचे उदाहरण अत्यंत अनुकरणीय आहे. निसर्गाशी असलेले आपले नाते जपण्याची आणि भावी पिढ्यांसाठी हिरवेगार भविष्य निर्माण करण्याची हीच खरी वेळ आहे. केवळ शासनावर अवलंबून न राहता, सामान्य नागरिकांनीही वृक्षारोपण करणे, झाडांचे संरक्षण करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आवश्यक आहे. तरच आपले जीवन अधिक समृद्ध आणि सुरक्षित राहू शकते.

**संकलन - संप्रदा बीडकर**

# आपल्या घरातील विजेची बचत करा

महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात तापमान आधीच सामान्य पातळीपेक्षा ८ओउ ने जास्त असल्याने, बऱ्याच घरांमध्ये AC दिवसभर चालू असतात. पण खरी समस्या अशी आहे की, -उ चा जास्त वापर म्हणजे बऱ्याचदा विजेची बिले गगनाला भिडणारी येतात. काही साधे बदल करून तुम्ही यात मोठा फरक घडवून आणू शकता.

तुमचे AC चे बिल कमी करण्यासाठी हे ५ सोपे उपाय खालीलप्रमाणे आहेत:

AC चे तापमान खूपच कमी ठेवण्याऐवजी २४-२६ओउ च्या दरम्यान सेट करा.

दुपारच्या कडक उन्हाच्या वेळी खिडक्यांचे पडदे किंवा 'ब्लाईंड्स' (blinds) लावून घ्या. थंड हवा अधिक वेगाने सर्वत्र पसरवण्यासाठीAC सोबतच छतावरील पंख्याचाही वापर करा.

AC ची कार्यक्षमता उत्तम राखण्यासाठी त्याचे फिल्टर्स नियमितपणे स्वच्छ करा.AC रात्रभर चालू ठेवण्याऐवजी 'टायमर' (timer) किंवा 'स्लीप मोड' (sleep mode) चा वापर करा.

अशा छोट्या सवयींमुळे विजेचा वापर कमी होतो आणि तुमचे मासिक विजेचे बिल देखील कमी येईल.

अशा तीव्र उष्णतेच्या लाटेत (heatwave), विजेची बचत झालेली प्रत्येक युनिट मोलाची ठरते.



# सिलिंडरला वेगळे आणि उत्तम पर्याय आहेत 'हे' गॅझेट्स

घर-गुती गॅस सिलिंडरचा तुटवडा, हा विषय सध्या केंद्रस्थानी असून त्याला पर्याय म्हणून इंडक्शनचा विचार केला जात आहे. मात्र, आता इंडक्शनचे वाढते भाव आणि तुटवडा, या कारणांमुळे त्यालाही पर्याय काय? अशी चर्चा सगळीकडे आहे. याच पार्श्वभूमीवर अशा काही गॅझेट्सची माहिती घेऊ :

इंडक्शन स्टोव्हची मागणी इतकी वाढली आहे की अनेक ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरून इंडक्शन स्टोव्हचा स्टॉक संपले आहेत. अशा परिस्थितीत अशी काही गॅजेट्स आहेत, ज्यांच्या मदतीने तुम्ही गरज भागवता आणि ते गॅजेट्स फार महाग पडत नाहीत. इन्फ्रारेड कूकटॉप्स, इलेक्ट्रिक राईस कुकर, पोर्टेबल गॅस स्टोव्ह आणि मल्टी-पर्पज इलेक्ट्रिक केटल्स ही काही गॅझेट्स आहेत जी ङ्झऋ त्र्री सिलिंडरच्या कमतरतेतही आपल्याला आवश्यक अन्न शिजवण्यात मदत करतात.इन्फ्रारेड कूकटॉप हा एक चांगला पर्याय

तुम्ही इंडक्शन स्टोव्हसारखे काहीतरी खरेदी करू इच्छित असल्यास, तुम्ही इन्फ्रारेड कूकटॉप खरेदी करू शकता किंवा इन्फ्रारेड स्टोव्ह म्हणू शकता. ते इंडक्शन स्टोव्हसारखे दिसतात, परंतु त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते



चिकणमाती, ॲल्युमिनियम आणि स्टीलसह कोणतीही धातूची भांडी चालवतात. तुम्ही चांगल्या कंपनीचे २,५०० पासून ते चार हजार रुपयांमध्ये इन्फ्रारेड स्टोव्ह उपलब्ध आहेत.

इलेक्ट्रिक केटल स्वस्त

इलेक्ट्रिक केटल स्वयंपाकासाठी खरेदी करताना मोठ्या तोंडाची खरेदी करावी , जेणेकरून त्यात स्वयंपाकही करता येईल. १.२ ते १.५ लिटर क्षमतेची चांगली मल्टी-कुक केटल ८०० ते १८०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहे. त्यामध्ये उकळत्या पाण्यापासून ते मॅगीपासून भाज्या बनवण्यापर्यंत स्वयंपाक करू शकता.

पोर्टेबल गॅस स्टोव्ह-ङ्झऋ त्र्री सिलिंडरचा बॅकअप म्हणून, पोर्टेबल गॅस स्टोव्ह हे सर्वात लहान आणि सर्वात प्रभावी गॅझेट आहे. हे लहान ब्यूटेन कॅनपासून चालते आणि कोठेही नेले जाऊ शकते. हे सहसा कॅम्पिंग किंवा मैदानी स्वयंपाकासाठी वापरले जाते, परंतु आपण ते घरी बॅकअप म्हणून देखील वापरू शकता. त्याची किंमत एक हजारापासून ते अडीच हजार रुपयांपर्यंत आहे. याला जास्त जागा देखील जात नाही आणि बॅकअप म्हणून 'ब्यूटेन कॅन' ठेवून आवश्यक तितके अन्न शिजवू शकतो.

इलेक्ट्रिक राईस कुकर

इलेक्ट्रिक राईस कुकर तांदूळ तसेच भाज्या, कॅसरोल आणि मोमोज तयार करण्यासाठी हे खूप उपयुक्त आहे. याच्या मदतीने आपण ङ्झऋ त्र्री सिलिंडरशिवायही चांगले स्वयंपाक करू शकता. बाजारात प्रमाणित १.८ लिटर राईस कुकरची किंमत १८०० ते सडे तीन हजार दरम्यान आहे. अशा गॅझेटचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात अन्न गरम ठेवण्याचे 'कीप वार्म' वैशिष्ट्य ते अधिक वापरण्या योग्य बनवते.

काही महागडे पर्याय-मायक्रोवेव्ह, ओव्हन किंवा एअर फ्रायर सारख्या ङ्झऋ गॅसच्या जागी वापरल्या जाणाऱ्या या गॅझेट्समध्ये काही महाग पर्याय देखील उपलब्ध आ-हेत. ही गॅझेट्स स्वयंपाकाचे आणखी पर्याय उघडतात, परंतु वरील पर्यायांच्या तुलनेत जास्त बजेट ठेवावे लागेल. हे एक-वेळच्या गुंतवणूकीसारखे आहे, ज्याचा आपण बराच काळ फायदा घेण्यास सक्षम असाल. मायक्रोवेव्ह किंवा ओव्हन सारखी गॅझेट्स केवळ स्वयंपाकच देत ना-हीत तर बेकिंगचे पर्यायही उपलब्ध करून देतात आणि यांच्या मदतीने अन्न गरम देखील केले जाऊ शकते. त्याच

# बद्धकोष्ठतेपासून मुक्ततेसाठी



बद्धकोष्ठतेपासून आराम मिळवण्यासाठी फायबरयुक्त आहार (फळे, भाज्या, कडधान्ये) घ्या, दिवसातून ३-४ लिटर पाणी प्या आणि नियमित व्यायाम करा. सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाणी, लिंबू-मध, किंवा रात्री त्रिफळा चूर्ण घेणे फायदेशीर आहे. प्रक्रिया केलेले अन्न, मैदा आणि अति चहा-कॉफी टाळा.

बद्धकोष्ठतेसाठी महत्त्वाच्या आरोग्य टिप्स-फायबरचे प्रमाण वाढवा: आह-ारात हिरव्या पालेभाज्या, फळे (उदा. पपई, पेरू, सफरचंद), आणि कडधान्यांचा समावेश करा.भरपूर पाणी प्या: दिवसभरात पुरेसे पाणी प्यायल्याने शौच मऊ रा-हते आणि आतड्यांमधून सहज बाहेर पडते.**नियमित व्यायाम:** शारीरिक हालचाल, जसे की चालणे, योगासने किंवा व्यायाम, आतड्यांची कार्यक्षमता सुधारते.

हे पदार्थ टाळा: मैदा, प्रक्रिया केलेले अन्न, अति दूध, बिअर आणि अल्कोहोलचे सेवन टाळा, कारण यामुळे बद्धकोष्ठता वाढू शकते.

**घरगुती उपाय:**रात्री झोपताना कोमट पाण्यात १-२ चमचे त्रिफळा चूर्ण घ्या.

सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाण्यात लिंबू आणि मध टाकून प्या.इसबगोल दुधासोबत किंवा पाण्यासोबत घेणे फायदेशीर ठरू शकते.

स्वच्छता आणि दिनचर्या: नैसर्गिक वेळेवर (सकाळी) शौचास जाण्याची सवय लावा.

टीप: जर समस्येमध्ये दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ सुधारणा झाली नाही, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# कलंकित नामवंतव्यक्ती



राजकारणातील गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी केवळ कायदेशीर तरतुदी पुरेशा नाहीत. राजकीय पक्षांनी चारित्र्यसंपन्न उमेदवार देणे आणि मतदारांनी मतदान करताना जागरूक राहणे आवश्यक ठरते.

असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स या संस्थेचा ताजा अहवाल परवा प्रसिद्ध झाला. निवडणूक सुधारणांवर लक्ष केंद्रित करणार्या या संस्थेच्या ताज्या अहवालातून राजकारणातील गुन्हेगारीकरणाचे वास्तव समोर आले आहे. राज्यसभेतील ३२ टक्के म्हणजे तब्बल ७३ खासदार फौजदारी गुन्ह्यात अडकलेले

आहेत. त्यातही नैतिकतेचा टेंभा मिरवणार्या भाजपच्या सदस्यांची संख्या सर्वाधिक आहे. भाजपच्या ९९ खासदारांपैकी २७, काँग्रेसच्या २८ पैकी १२ आणि तृणमूलच्या १३ पैकी चार खासदारांवर फौजदारी खटले असल्याचे या अहवालात म्हटले आहे. राज्यसभेतील खासदारांची सरासरी मालमत्ता १२० कोटीपेक्षा अधिक आहे. त्यातील ३१ खासदार अब्जाधीश आहेत, असे हा अह-वाल सांगतो. ज्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल आहेत, त्यातील ३६ खासदारांवर (१६ टक्के) हत्या, हत्येचा प्रयत्न आणि महिलांविरुद्धचे गुन्हे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. एकूणच हा अहवाल भारतीय लोकशाहीसमोर असलेल्या गंभीर आव्हानांकडे लक्ष वेधणारा आहे. राज्यसभा हे वरिष्ठ सभागृह म्हणून ओळखले जाते. ज्याला विद्वानांचे सभागृह मानले जाते, तिथेच ३२ टक्के सदस्य गुन्हेगारी पार्श्वभूमीचे असणे हे चिंतेचे आहे. जेथे वैचारिक स्वरूपाच्या चर्चा होणे अपेक्षित असते, तेथे राजकीय पक्षासाठी निवडून येण्याची क्षमता ही नैतिकतेपेक्षा अधिक महत्त्वाची ठरत आहे. ज्यांनी लोकशाहीत कायदे करायचे त्यांच्यावरच कायद्याचे उल्लंघन केल्याचे आरोप असणे हे लोकशाहीच्या प्रतिमेला तडा देणारे ठरते. सदस्यांची सरासरी संपत्ती १२० कोटींपेक्षा अधिक असणे, आणि अब्जाधीश सदस्यांची वाढती संख्या हेच सूचित करते की राजकारण आता सामान्य आणि अधिक लायक व्यक्तीच्या आवाक्याबाहेरचे झाले आहे. ते केवळ धनदांडग्या व्यक्तीची मक्तेदारी ठरत आहे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण होत असल्याची हाकाटी पिटली जाते. त्याचेच प्रतिबिंब आता राज्यसभेतही दिसत आहे.

मतदारांची जबाबदारी

एडीआरचा हा अहवाल केवळ आकडेवारी नसून, तो लोकशाही व्यवस्थेला असलेला धोका सूचित करणारा इशारा आहे. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तींना संसदेपासून दूर ठेवण्यासाठी निवडणूक सुधारणांची गरजही या अहवालातून अधोरेखित होते. गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोक संसदेत असतील तर ते स्वत:च्या फायद्यासाठी कायदे वाकवू शकतात, तपास यंत्रणावर दबावही आणू शकतात. जेव्हा बाहुबली किंवा धनशक्ती असणार्यांनाच उमेदवारी दिली जाते तेव्हा सुशिक्षित, प्रामाणिक आणि सेवाभावी व्यक्ती राजकारणापासून दूर राहण्याचा धोका यातून संभवतो. लोकप्रतिनिधींवरील खटले वर्षानुवर्षे चालतात. जोवर शिक्षा होत नाही तोवर ते निरपराधी म्हणूनच वावरतात, पदावरही राहतात. कायदेशीर पळवाट त्यांच्या पथ्यावरच पडते. राजकारणाचे गुन्हेगारीकरण हा केवळ हळहळ व्यक्त करण्याचा विषय नाही. ज्यांच्यावर गंभीर गुन्हे आहेत किंवा सिद्ध झाले आहेत. त्यांना निवडणूक लढवण्यास कायमस्वरूपी बंदी असायला हवी. लोकप्रतिनिधीवरील खटले सहा महिन्यांच्या आत निकाली निघतील अशा स्वरूपाची कायद्यात तरतूद असावी. मतदार अनेकदा पक्ष, चिन्ह, जात, धर्म किंवा पक्षाचा नेता पाहून मतदान करतो; पण उमेदवार कोण? त्याचे चारित्र्य काय? हे तपासून पाहणे ही मतदाराचीच जबाबदारी ठरते. एडीआरसारख्या संस्थांचे अहवाल; त्यातील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवाराविषयीची माहिती मतदान करण्यापूर्वी लक्षात घेऊन मतदान केल्यास राजकारणातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी होऊ शकेल. अल्पकालीन फायद्यासाठी किंवा भीतीपोटी गुन्हेगारी स्वरूपाची पार्श्वभूमी असलेल्या उमेदवाराला मत म्हणजे अप्रत्यक्षपणे गुन्हेगारीला सत्तेचे संरक्षण देण्यासारखेच ठरते. यातून आपणच उद्याच्या पिढीसाठी असुरक्षित समाज निर्माण करीत आहोत, याचे भान राखणे गरजेचे आहे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



**(क्रमशः कालच्या अंकावरुन)**–आवडत असेल तर साखर घाला. ढवळा. हे जांभूळ सरबत अगदी नैसर्गिक असल्यामुळे चवदार लागते. तुम्ही आईसक्रीम मध्येही घालू शकता.

जांभूळ हे उत्तम फळ आहे सुश्रुतांच्या मते जांभूळ पित्त, रक्तदहनाशक, शरीराची कांती सुंदर बनवणारे आहे. जांभूळ खाल्ल्याने रक्त लाल बनते. जांभळे मीठ टाकून खाणे हितावह आहे जांभळा मध्ये लोह फॉस्फरस, फॉलिक एसिड असते. जांभळे किडकी खाऊ नयेत. जांभूळ पिकण्यासाठी ग्रीष्माचे ऊन आणि वर्षाऋतूतील पावसाचा शिडकावा लागतो. बुद्ध लोक या झाडाला पवित्र मानतात.

## २ Joke — विनोद





स्पर्धा :

न्यायालयाजवळील टायपिंगच्या दुकानावर पाटी होती, 'कागदपत्रे टाईप केली जातात, तीन भाषेत.'

काही दिवसांनी त्याच्याजवळ दुसरे दुकान निघाले. तिथे पाटी होती, 'झेरॉक्स प्रती मिळतील कोणत्याही भाषेत.'

## ३ Message — संदेश



Santa badi der se apne room me kuch dhoond rha tha,

pareshan hokar uski biwi Jeeto boli Jeeto – Kya dhoond rahe ho?

Santa – Hidden Camera

Jeeto – Tumhe Kaise pata is room me hidden camera hai?

Santa – Agar hidden camera nahi hota to T.V. wale is aadmi ko kaise pata hota ki hum star plus dekh rahe hain, bar bar ye -"aap dekh rahe hain star plus" bol raha hai.

## ४ Thought — सुविचार




जगातील सर्व प्रतिभासंपन्न माणसे ईश्वराच्या समीप असतात.
– स्टीव्हनसन

**संस्कृत सुभाषित**

**स्वभावो नोपदेशने शक्यते कर्तुमन्यथा।**
**सुतप्तमपि पानीयं पुनर्गच्छति शीतताम।।**

अर्थ : उपदेश केल्याने माणसाच्या स्वभावात होणारे परिवर्तन हे तेवढ्यापुरतेच असते, ते टिकत नाही. खूप तापवलेले पाणी पुन्हा थंड होत असते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. पुरोगामी, आधुनिक विचारांचा
४. हिरव्या रंगाचा कीटक
७. साडेसातीचा अडीच वर्षांचा दुसरा टप्पा
९. काचेवरील ओरखडा
१०. नित्यनेमाने केलेले वाचन
११. 'जगी हा खास वेड्यांचा --- माजला सारा' (रणदुंदुभी नाटकातील मा.दीनानाथ यांचे गाजलेले पद)
१२. अडथळा, पाचर
१३. आमदार-खासदारांनी घातलेल्या गोंधळासाठी रूढ झालेला शब्द
१५. गंगाजल
१७. कैकेयीची दासी
१८. हिंदीत पैंजण
२०. पहारा, रक्षण
२१. अंतर्गत
२२. साद
२४. अनामिकेशेजारील बोट
२४अ. धमनी, नाडी
२५. बांबू
२७. आठवड्यातील दिवस
२८. तोल सांभाळण्याची कामगिरी
३०. पथारी
३३. नाहक, विनाकारण
३५. कार्तिकेयाच्या मुखांची संख्या
३६. शाहीराजवळचे वाद्य
३८. नाडी
३९. जिन्नस
४०. पद्धत
४१. एक प्रायश्चित कर्म
४२. चिंता
४४. कर्णाची उपाधी
४५. सगेसोयरे
४७. बहुपेडी साखळी
४८. वावडी, ऐकीव गोष्ट
५०. आभाळ
५१. अदृश्य
५४. पर्वत
५६. खण पण चोळीचा नव्हे
५७. पोपट
५९. बाणेदार स्त्री, जयश्री गडकर यांचा गाजलेला चित्रपट
६१. मृदंग
६३. लक्ष्मी
६४. कोर्टातील विरुद्ध पक्ष
६६. 'जैसे थे' परिस्थिती
६७. फटफजिती होईल असे
७०. बाण
७२. पाणी ओघळून जाईल असा उतार
७३. मुलगा, पुत्र
७४. एकत्रित भोजन
७५. नवलाची कामगिरी

## उभे शब्द

१. गृहमंत्री सुनेच्या लेखी सासूबाई म्हणजे –
२. प्रवाह
३. ललाट
४. दुर्लक्ष, हेळसांड
५. वाळवंट
६. अणकुचीदार
७. तोंड लपवून स्वदेश सोडण्याची वेळ आलेला
८. धनुष्यबाण
११. लुटालुट
१२. हिंदीत काकडी
१४. ताबडतोब पैसे मोजून
१६. गौरवर्णी, साजिरी
१८. स्तर
१९. बारीकसारीक, किरकोळ
२१. चूक, अवमान
२३. उणीव, कमतरता
२४. नव्या नोटेचा स्पर्श
२६. काखेत मावणारी घागर
२७. प्रशंसेचा उद्गार
२८. सत्त्वयुक्त
२९. त्वरित, अचानक
३१. हा प्रामाणिक असेल तर देशाची तिजोरी भरते
३२. गावभर स्वैर भटकणारी
३४. नातेवाईक
३७. मोबदला, परिणाम
४३. पाणी, आयुष्य
४५. हिंदीत अपवित्र
४६. कोट, किल्ला
४९. रममाण झालेला
५२. पावलोपावली, सतत
५३. पाच दिवस काम असेल तर हा देखील सुट्टीचा दिवस
५५. चांदोबाची सुट्टी!
५८. दागदागिने
६०. फार, खूप
६२. प्राप्ती, आवक
६५. घाव, प्रहार
६७. सोने
६८. उणीव पण न भासणारी
६९. राज्य
७१. ज्वाला, दाह

## आडवे उत्तर

१.सुधारक ४.हरणटोळ ७.पनवती ९.धाक १०.पारायण ११.कसारा १२.खीळ १३.गदारोळ १५.गंगोदक १७.मंथरा १८.पायल २०.रखवालदारी २१.आत २२.हाक २४.करंगळी २४अ.नस २५.कळक २७.वार २८.कसरत ३०.वळकटी ३३.हकनाक ३५.सहा ३६.डफ ३८.शीर ३९.नग ४०.रीत ४१.गोदान ४२.काळजी ४४.दानवीर ४५.नातलग ४७.गोफ ४८.वदंता ५०.नभ ५१.गडप ५४.नग ५६.कप्पा ५७.कीर ५९.मानिनी ६१.पखवाज ६३.कमला ६४.प्रतिवादी ६६.रमारम ६७.हास्यास्पद ७०.शर ७२.पाणलोट ७३.तनय ७४.अंगतपंगत ७५.करामत

## उभे उत्तर

१.सूचनामंत्री २.धारा ३.कपाळ ४.हयगय ५.रण ६.टोकदार ७.परागंदा ८.तीरकमठा ११.पळवापळव १२.खीरा १४.रोख १६.गोरीगोमटी १८.पातळी १९.लहानसहान २१.आगळीक २३.कसर २४.करकरीत २६.कळशी २७.वाह २८.कसदार २९.तडकाफडकी ३१.करदाता ३२.नगरभवानी ३४.नातलग ३७.फळ ४३.जीवन ४५.नापाक ४६.गड ४९.दंगलेला ५२.पदोपदी ५३.शनिवार ५५.अमावस्या ५८.रकमपात ६०.अतिशय ६२.जमा ६५.वार ६७.हाटक ६८.ददात ६९.प्रांत ७१.आग




## थोडक्यात/ संक्षिप्त

### सिकंदर शेखची हार,बाहुबली कडून चितपट, महाराष्ट्र केसरीत धक्कादायक निकाल

**पुणे**–पुण्यातील वाघोली येथे रामकृष्ण सातव पाटील यांच्या वतीने आयोजित ६८ व्या महाराष्ट्र केसरी २०२६ स्पर्धेत किताब गटातील अंतिम फ ेरीत सोलापूरचा मबाहुबलीफ महेंद्र गायकवाडने हिंगोलीचा मचपळ चिताफ सिकंदर शेखला चितपट केलं आहे. अंतिम फेरीत मबाहुबलीफ महेंद्र गायकवाडने सिकंदर शेखला ३–० ने पराभूत केलं आहे. महेंद्र गायकवाड आता या विजयानंतर गादी विभागातील विजेता ठरलेल्या हर्षवर्धन सदगीरसोबत फायनलध्ये कुस्ती करणार आहे.सोलापूरचा मबाहुबलीफ महेंद्र गायकवाडने हिंगोलीचा मचपळ चिताफ सिकंदर शेख या दोन्ही दोन्ही मल्लांनी पहिल्या मिनिटापासून आक्रामक सूरूवात केली होती. यावेळी मबाहुबलीफ महेंद्र सिकंदर शेखने ताबा मिळवत दोन गुण मिळवले होते. त्यानंतर स्टेपआऊट करून महेंद्र गायकवाडला एक गुण पटकावून ३ गुणांची आघाडी घेतली होती. त्यामुळे पहिल्या फेरीत महेंद्र गायकवाड ३ गुण सिकंदर शेख शुन्य गुणावप होता. दुसऱ्या फेरीत सिकंदर शेखने गुण मिळवण्याचा प्रयत्न केला.पण बाहुबली असलेल्या महेद्र गायकवाडने सिकंदरला दोन्ही फ ेऱ्यात एक गुण घेऊ दिला नाही.

### ऑस्ट्रेलिया भारताविरुद्ध ५ कसोटी सामने खेळणार,बॉर्डर गावस्कर ट्रॉफीसाठी भारताचा दौरा करणार

**पर्थ**–ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डाने २०२६–२७ या वर्षासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलिया आगामी काळात खूप व्यस्त असणार आहे. ऑस्ट्रेलिया पुढील वर्षी भारताचा दौरा करणार आहे. बॉर्डर गावस्कर ट्रॉफीसाठी ऑस्ट्रेलिया भारताचा दौरा करेल. यावेळी दोन्ही संघ ५ कसोटी सामने खेळतील. पॅट कमिन्स आणि इतर खेळाडूंसाठी भारताचा दौरा शेवटचा ठरू शकतो. ऑस्ट्रेलिया डिसेंबर ते मार्च दरम्यान १४ आठवड्यात १० कसोटी सामने खेळेल. ऑस्ट्रेलिया ऑगस्ट २०२६ मध्ये बांगलादेश विरुद्ध दोन कसोटी सामने खेळेल. या मालिकेपासून सुरुवात झाल्यानंतर शेवटचा सामना इंग्लंड विरुद्ध मार्च २०२७ मध्ये मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर होईल. कसोटी क्रिकेटच्या १५० व्या वर्षानिमित्त या डे नाईट क्रिकेट सामन्याचं आयोजन करण्यात आलं आहे. पॅट कमिन्स, स्टीव स्मिथ, मिशेल स्टार्क, जोश हेझलवूड, नॅथन लायन यांच्यासाठी बॉर्डर गावस्कर ट्रॉफीसाठीचा भारताचा दौरा अखेरची संधी असू शकते. कारण यां खेळाडूंना भारतात कसोटी मालिका जिंकता आलेली नाही, असं क्रिकेट ऑस्ट्रेलियानं म्हटलं आहे.

### पप्पू यादवांच्या मुलाने आयपीएल पूर्वी केला धमाका!

**दिल्ली**–आयपीएलचा नवीन सीजन सुरु होण्यासाठी आता अवघे काही दिवस उरले आहेत. लवकरच ही दमदार स्पर्धा सुरु होणार आहे. त्याआधी सगळ्याच संघांनी सराव करायला सुरुवात केली आहे. याच दरम्यान कोलकाता नाईट रायडरचा संघ कंबर कसून तयारी करत आहे. अलिडकेच कोलकाता नाईट रायडर संघाने सराव सामना खेळला. या सामन्यात खेळाडूंना दोन गटांत विभागण्यात आलं एक म्हणजे पर्पल नाइट्स आणि दुसरं गोल्ड नाइट्स असा संघ. याच सामन्यात गोल्ड नाइट्सकडून खेळताना सार्थक रंजन याने आपल्या आक्रमक खेळाने सर्वांचं लक्ष वेधून घेतले.

सार्थकची दमदार खेळी –सार्थकने फक्त १६ चेंडूत ३७ धावा करत आपली क्षमता दाखवून दिली. त्याच्या या छोटेखानी पण स्फोटक खेळीमध्ये चौकार–षटकारांची आतषबाजी पाहायला मिळाली. विशेष म्हणजे, त्याने प्रतिस्पर्धी गोलंदाजांवर सुरुवातीपासूनच दबाव टाकला.पर्पल नाइट्सचा वेगवान गोलंदाज वैभव अरोरा हा त्याच्या निशाण्यावर होता. त्याच्या एका षटकात सार्थकने दोन षटकार आणि दोन चौकार ठोकत झटपट तब्बल २० धावा काढल्या.

# यंदाचा महाराष्ट्र केसरी ठरला महेंद्र गायकवाड

## महेंद्र गायकवाड कुस्ती जिंकताच सिकंदर शेखच्या पाया पडला



### महाराष्ट्र केसरी होताच हर्षवर्धन सदगीरची मॅटवरील कुस्तीतून निवृत्ती, सरकारवर नाराजी व्यक्त करत घेतला धक्कादायक निर्णय

पुणे (वाघोली): नवमहेंद्र गायकवाड आणि हर्षवर्धन सदगीर यांच्यात झालेल्या अंतिम लढतीतल हर्षवर्धनने ४–३ अशा फरकाने विजय मिळवला. या विजयासह हर्षवर्धनने सदगीर डबल महाराष्ट्र केसरी ठरला खरा पण त्यानंतर त्याने मॅटवरील कुस्तीतून निवृत्ती जाहीर केली आहे. पण यादरम्यान सिकंदर शेख व महेंद्र गायकवाड यांच्यातील कुस्तीचा व्हीडिओ सध्या चर्चेत आहे.

**हर्षवर्धन सदगीर ठरला चांदीच्या गदेचा मानकरी**

हर्षवर्धन सदगीर आणि महेंद्र गायकवाड यांच्यात तगडी स्पर्धा अपेक्षित होती. लढतीला अपेक्षित आक्रमक सुरुवात झाली होती. महेंद्रने सुरुवातीलाच हर्षवर्धनला संरक्षक क्षेत्रात नेत एका गुणाची वसूली केली होती. लढतीदरम्यान महेंद्र सातत्याने हर्षवर्धनच्या चेहऱ्यावर हात मारत होता. यामुळे पूर्वार्धात याचा दंड म्हणून प्रतिस्पर्धी हर्षवर्धनला एक गुण देण्यात आला होता. मध्यंतराला १–१ अशी लढत बरोबरीत राहिली होती. त्यानंतर उत्तरार्धात निष्क्रय कुस्तीत अपयशी ठरल्याने हर्षवर्धनला दुसऱ्यांदा आयता गुण मिळाला. संधी मिळताच हर्षवर्धनने महेंद्रवर ताबा घेत दोन गुणांची कमाई करत ४–१ अशी आघाडी घेतली. त्यानंतर महेंद्रने दोनवेळा हर्षवर्धनला संरक्षक क्षेत्रातून बाहेर नेत दोन गुणांची संपली होती. कमाई केली. पण, तोवर वेळ संपली आणि हर्षवर्धन सदगीर विजेता ठरला.

तत्पूर्वी बाहुबली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महेंद्र गायकवाडच्या कृतीमुळे सर्वांची मनं जिंकली. महेंद्र गायकवाडने माती विभागातील

### त्या कृतीनं जिंकली सर्वांची मनं

**जिंकता सिकंदरच्या पडला पाया**

महाराष्ट्र केसरी २०२६ मधील खिलाडूवृत्तीचं दर्शन घडवणारा भावनिक व्हीडिओ सध्या सगळीकडे व्हायरल होत आहे. पुण्यातील वाघोळी येथे प्रतिष्ठित ६८ वी महाराष्ट्र केसरी स्पर्धा पार पडली. यंदाच्या महाराष्ट्र केसरीचा मानकरी हर्षवर्धन सदगीर ठरला.

अंतिम लढतीत सर्वाधिक लोकप्रिय असलेला आणि किताबासाठी पहिली पसंती असलेल्या सिकंदर शेखचा ३–० असा एकतर्फी पराभव केला. या प्रतिष्ठित लढतीत सिकंदर शेखचा पराभव करत महेंद्र गायकवाडने किताबी लढतीसाठी पात्रता मिळावली. पहिल्या फ ेरीपासूनच महेंद्रने नेहमीप्रमाणे आक्रमक सुरूवात केली आणि पहिल्या मिनिटात एक गुण मिळवला. त्यानंतर पकड मिळवत त्याने दोन गुणांची कमाई केली. दुसऱ्या फेरीत सिकंदरने आक्रमक पवित्रा घेतला, पण गुण काही खात्यात भरू शकला नाही.अखेरीस महेंद्र गायकवाडला वेळ संपल्यानंतर विजेता घोषित करण्यात आलं. यानंतर पंचांनी महेंद्रचा हात वर करत त्याला विजेता घोषित केलं. पण महेंद्रने यानंतर आखाड्यातच सिकंदर शेखच्या पायाला हात लावत आदर व्यक्त केला. महेंद्रच्या या खिलाडूवृत्तीने साऱ्यांची मनं जिंकली सिकंदर शेखने आपल्या मेहनतीच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण केली. त्याने २०१८ मधील अंडर–२३ कुस्ती चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक पटकावलं होतं. सिकंदर हा कोल्हापूरातील गंगावेश तालमीचा पठ्ठ्या आहे.



## लंडन जाण्यासाठी विराटने मागितले स्पेशल चार्टड विमान?

### कोहलीने स्वत: दिले दाव्यांना प्रत्युत्तर

नवी दिल्ली–दिग्गज भारतीय फलंदाज विराट कोहली आजकाल सोशल मीडियावर खूप सक्रिय झाला आहे आणि अनेकदा अफवांना त्याच्या खास शैलीत उत्तर देतो. नुकतंच, त्याने एका इंस्टाग्राम स्टोरीद्वारे खोट्या बातम्यांवर टीका केली. या स्टोरीमध्ये, कोहलीने आयपीएल दरम्यान लंडनला येण्या–जाण्यासाठी विशेष विमान मागितल्याच्या दाव्यांची खिल्ली उडवली.

खोट्या बातम्यांवर विराटची मजेशीर प्रतिक्रिया : विराट कोहलीनं त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एका बातमीच्या पोस्टचा स्क्रीनशॉट शेअर केला, ज्यामध्ये असा दावा करण्यात आला होता की कोहलीनं आरसीबी व्यवस्थापनाकडे भारत आणि लंडन दरम्यान चार्टर्ड फ्लाइटची विनंती केली होती. त्या पोस्टमध्ये पुढं असंही म्हटलं होतं की, जर सामन्यांमध्ये तीन दिवसांपेक्षा जास्त अंतर असेल, तर कोहलीला लंडनला जाऊन पुढच्या सामन्याच्या अगदी आधी परतायचं होतं. यानंतर आता विराटनं या पोस्टसोबत दोन हसणारे इमोजी जोडून हे स्पष्ट केलं की हे वृत्त पूर्णपणे निराधार आणि काल्पनिक होतं.

अफवांना खतपाणी घालणाऱ्या बातम्यांना प्रत्युत्तर : क्लिकबेट बातम्या अनेकदा स्टार क्रिकेटपटूंच्या नावाखाली पसरवल्या जातात, पण यावेळी कोहलीनं एकही शब्द न बोलता सत्य उघड केलं. त्याच्या प्रतिक्रियेवरुन हे स्पष्टपणे दिसून येतं की, तो सध्या चिन्नास्वामी स्टेडियममधील आरसीबीच्या प्रशिक्षण शिबिरावर आणि आगामी आयपीएल हंगामावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करत आहे. विराटनं कोणताही वाद न निर्माण करता ही खोटी बातमी फेटाळून लावल्यामुळे चाहतं त्याच्या स्पष्टवक्तेपणाचे कौतुक करत आहेत.

कोहली आयपीएल २०२६ च्या तयारीत व्यस्त : अलीकडेच, आरसीबीच्या पहिल्या सराव सत्रादरम्यान कोहलीनं संघाला १२० टक्के सहकार्य देण्याचा मंत्र दिला. तो आपल्या फिटनेस आणि खेळाबाबत अत्यंत गंभीर आहे, त्यामुळं अशा बेजबाबदार बातम्यांवरील त्याची प्रतिक्रिया सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. मैदानावर आणि मैदानाबाहेरही अफवांना कसं उडवून लावायचं हे कोहलीला माहीत आहे, हे त्यानं पुन्हा एकदा सिद्ध केलं आहे.

## हर्षितनंतर आकाश दीपदेखील संपूर्ण आयपीएल हंगामातून बाहेर

मुंबई–आयपीएल २०२६ च्या आधी कोलकाता नाईट रायडर्सच्या अडचणी कमी होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. हर्षित राणानंतर, वेगवान गोलंदाज आकाश दीप देखील आयपीएल २०२६ मध्ये खेळू शकणार नाही. याचा केकेआरच्या वेगवान गोलंदाजीवर गंभीर परिणाम झाला आहे. श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज मथिशा पाथिरानाचा सहभागही अजून अनिश्चित आहे. हे स्पष्ट आहे की, तो सुरुवातीच्या सामन्यांमध्ये खेळणार नाही. परिणामी, अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील संघाला आगामी हंगामापूर्वी वेगवान गोलंदाजासाठी बदली क्रिकेटपटू शोधावा लागणार आहे. आकाश दिप आयपीएलमधून बाहेर आहे आणि संपूर्ण हंगाम खेळू शकणार नाही. असे समजले आहे की, आकाश दीपच्या पाठीच्या खालच्या भागात स्ट्रेस रिॲक्शनचा त्रास होत आहे. रणजी ट्रॉफीदरम्यान त्याला ही दुखापत झाली होती. त्याला बरे होण्यासाठी किमान तीन महिने लागण्याची शक्यता आहे. या २९ वर्षीय वेगवान गोलंदाजाला केकेआरने आयपीएल २०२६ च्या लिलावात १ कोटी रुपयांच्या मूळ किमतीत विकत घेतले होते.

त्याने यापूर्वी आयपीएलमध्ये लखनऊ

## पाकिस्तान घाबरले, तालिबानच्या भीतीने पीएसएलचा फज्जा!

मुंबई–तालिबानकडून होत असलेल्या हल्ल्यांमुळे आणि सुरक्षेच्या कारणास्तव पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने पीएसएलबद्दल मोठा निर्णय घेतला आहे. २६ मार्च पासून पाकिस्तान सुपर लीग (पीएसएल) ला सुरूवात होणार आहे, पण पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील तणावपूर्ण वातावरण आणि पश्चिम आशियामधल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे पीएसएल संकटात सापडलं होतं, त्यातच आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने पीएसएलबद्दल मोठं पाऊल उचललं आहे.

पाकिस्तान सुपर लीगचे सामने यंदा प्रेक्षकांशिवाय तसंच कराची आणि लाहोर या दोन शहरांमध्येच आयोजित केले जाणार आहेत. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी पत्रकार परिषद घेऊन याची माहिती दिली आहे. परिस्थिती सामन्य होत नाही, तोपर्यंत स्टेडियममध्ये प्रेक्षकांना प्रवेश दिला जाणार नाही, तसंच पीएसएल २०२६ ची ओपनिंग सेरेमनीही होणार नसल्याचं नक्वी यांनी स्पष्ट केलं.

पीएसएलचा प्लान काय?

मपीएसएल आमचा इंटरनॅशनल ब्रँड आहे, तसंच या स्पर्धेत बरेच परदेशी खेळाडू सहभागी होतात, त्यामुळे आम्ही स्पर्धा रद्द करू शकत नाही. सध्याच्या परिस्थितीमध्ये २५–३० हजार लोकांना स्टेडियममध्ये आणणं शक्य नाही. पाकिस्तान सरकार, पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि सुरक्षा यंत्रणांसोबत अनेक बैठका झाल्या. देशाची प्राथमिकता लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला आहेफ, अशी प्रतिक्रिया मोहसिन नक्वी यांनी दिली आहे. मआम्ही लोकांना प्रवास कमी करायला सांगत आहोत, त्यामुळे रोज हजारो प्रेक्षकांना स्टेडियममध्ये बोलाणं योग्य नाही, म्हणून हा कठीण निर्णय आम्हाला घ्यावा लागत आहे. सर्व टीमना प्रेक्षकांशिवाय होणाऱ्या सामन्यामुळे होत असलेल्या नुकसानीची भरपाई दिली जाईल. तसंच ज्या चाहत्यांनी तिकीट विकत घेतली आहे, त्यांना पुढच्या ७२ तासांमध्ये रिफंड दिला जाईलफ, अशी माहितीही मोहसिन नक्वी यांनी दिली.

## पाकिस्तान सुपर लीग प्रेक्षकांविना रिकाम्या स्टेडियममध्ये होणार

कराची–अमेरिका इराण युद्धाचा फटका आता क्रीडा स्पर्धांवरही होताना दिसत आहे. काही दिवसातच सुरू होणार असलेल्या पाकिस्तान सुपर लीगचे सामने प्रेक्षकांविना रिकाम्या स्टेडियममध्ये खेळवण्यात येणार आहेत. यंदा सहा ठिकाणी सामने होणार होते मात्र आता दोन किंवा एकाच ठिकाणी सामने आयोजित होण्याची शक्यता आहे. लाहोर किंवा कराची इथे सामने होण्याची शक्यता आहे. लाहोरमध्ये होणारा स्पर्धेचा उद्घाटन सोहळाही रद्द करण्यात आला आहे.

युद्ध संपलं तर स्पर्धेच्या उत्तरार्धात प्रेक्षकांना सामने मैदानात जाऊन पाहता येऊ शकतात असं पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे चेअरमन मोहसीन नक्वी यांनी सांगितलं. युद्ध कधी थांबेल याविषयी स्पष्टता नसल्याने प्रेक्षकांना सामने याचि देही याचि डोळा कधी पाहता येतील याविषयी सांगता येणार नाही असं नक्वी म्हणाले.

पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाचा थेट फटका पाकिस्तानला बसला आहे. पंतप्रधानांनी देशातील नागरिकांना त्यांच्या जाण्यायेण्यावर मर्यादा घालण्याचं आवाहन केलं आहे. शाळांना सुट्टी देण्यात आली



### सहाऐवजी दोनच ठिकाणी रंगणार सामने

आहे. कार्यालयात जाऊन काम करणाऱ्यांना घरून काम करण्याची मुभा देण्यात आली आहे. ईदची सुट्टी वाढवण्यात आली आहे.

सुरक्षा यंत्रणांशी संवाद साधल्यानंतर पाकिस्तान सुपर लीग वेळापत्रकानुसार होईल. पण लोकांना एकीकडे जाणंयेणं नियंत्रणात ठेवा सांगून दुसरीकडे ३०,००० लोक स्टेडियममध्ये बोलावू शकत नाही. परिस्थिती संवेदनशील असेपर्यंत, प्रेक्षकांविना सामने आयोजित होतील. हा निर्णय घेणं कठीण होतं पण सध्या त्याला पर्याय नाही. उद्घाटन सोहळाही म्हणूनच रद्द करण्यात आला आहे. प्रेक्षकांना प्रवेश नसल्यामुळे फ्रँचाइजींना नुकसान भरपाई देण्यात येईल असं नक्वी यांनी स्पष्ट केलं आहे. ज्यांनी आगाऊ तिकीटं खरेदी केली आहेत त्यांना पूर्ण परतावा देण्यात येईल. लाहोर आणि कराचीव्यतिरिक्त अन्य शहरांना आयोजनाची संधी मिळणार होती. या शहरातील चाहत्यांची नक्वी यांनी माफी मागितली आहे.

दरम्यान अगदी शेवटच्या क्षणी पाकिस्तान सुपर लीग सोडणाऱ्या किंवा करार मोडणाऱ्या खेळाडूंवर कारवाई केली जाईल असंही नक्वी यांनी स्पष्ट केलं. ब्लेसिंग मुझाराबानी आणि दासून शनका यांनी पीएसएलमधून माघार घेतली आहे. गुदकेश मोटी, जेक फ्रेझर मॅकगर्क, ओटनील बार्टमन आणि स्पेन्सर जॉन्सन यांनी वैयक्तिक कारणास्तव स्पर्धेतून माघार घेतली आहे. गेल्यावर्षीही आम्ही अशा स्वरुपाची कारवाई केली होती. गेल्या वर्षी पीएसएलमध्ये खेळणं अपेक्षित असलेल्या कार्बिन बॉशने आयपीएल स्पर्धेतील मुंबई इंडियन्सशी करारबद्ध होण्याचा निर्णय घेतला होता. पीएसएलचा हंगाम पुढे ढकलता येणार नाही. टी२० वर्ल्डकपमुळे यंदाचा हंगाम फेब्रुवारीऐवजी मार्च–एप्रिल मध्ये होत आहे. २६ मार्चपासून पीएसएलला सुरुवात होत असून, ३ मे रोजी अंतिम सामना होणार आहे.

# आयपीएल उत्सुकांचे जोरदार प्रदर्शन, आफ्रिकेने किवींना नमवले



**दिल्ली**–आयपीएल स्पर्धेत प्रत्येक संघाला दुखापतींच्या समस्येनं ग्रासलं आहे. अनेक खेळाडू हंगामात खेळू शकणार नाहीयेत. अशा परिस्थितीत संघांचा बदली खेळाडूंचा शोध सुरू आहे. दक्षिण आफ्रिका–न्यूझीलंड टी२० मालिकेच्या निमित्ताने आयपीएल संघांचा शोध पूर्ण झाला असं म्हणता येईल. आयपीएल उत्सुक गोलंदाजांनी आयपीएल संघमालकांना दखल घेणं भाग ठरेल अशी कामगिरी केली.

हाणामारीच्या षटकांसाठी चेन्नईने नॅथन एलिसला संघात घेतलं होतं. मात्र मांडीच्या स्नायूंना झालेल्या दुखापतीमुळे तो संपूर्ण स्पर्धेत खेळू शकणार नाहीये. सनरायझर्स हैदराबादचा जॅक एडवर्ड्स हादेखील स्पर्धेबाहेर गेला आहे. इंग्लंडचा अष्टपैलू सॅम करनही हंगामात खेळू शकणार नाहीये. भारतीय गोलंदाजांपैकी हर्षित राणा आणि आकाशदीप हे हंगामात खेळू शकणार नाहीयेत. ऑस्ट्रेलियाचं पॅट कमिन्स, जोश हेझलवूड आणि मिचेल स्टार्क हे त्रिकुट सुरुवातीचे काही सामने तरी खेळू शकणार नाहीयेत. ते नेमके कधी उपलब्ध होतील याविषयी साशंकता आहे. अन्य काही गोलंदाजांनाही दुखापतीची समस्या आहे. अशा परिस्थितीत आयपीएल संघव्यवस्थापन लिलावात अनसोल्ड खेळाडूंच्या कामगिरीकडे लक्ष ठेऊन आहे.

वेलिंग्टन इथे झालेल्या चौथ्या टी२० सामन्यात दक्षिण आफ्रिकेने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला. सलामीला बढती देण्यात आलेला विआन मुल्डर भोपळाही न फोडता तंबूत परतला. कॉनर इस्टरह्यूइन आणि टोनी द झोरी यांनी दुसऱ्या विकेटसाठी ८० धावांची भागीदारी केली. ३६ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ५७ धावांची खेळी करून कॉनर बाद झाला. पाठोपाठ टोनीही तंबूत परतला. त्याने २३ धावा केल्या.

रुबिन हरमनने नाबाद २८ धावांची खेळी केली. डिआन फोरेस्टर आणि जेसन स्मिथ यांनी प्रत्येकी १९ धावा केल्या. आफ्रिकेने १६४ धावांची मजल मारली. न्यूझीलंडतर्फे कायले जेमिसनने २ विकेट्स पटकावल्या. न्यूझीलंडसाठी टीम रॉबिन्सन (३२) आणि डेन क्लेव्हर (२६) यांचा अपवाद वगळता बाकी खेळाडूंना मोठी खेळी करता आली नाही. पदार्पणवीर प्रेनलेन सुब्रयान आणि केशव महाराज या फिरकीपटूंनी न्यूझीलंडच्या डावाला वेसण घातली. या दोघांनी शिस्तबद्ध मारा करताना धावाही रोखल्या आणि विकेट्सही पटकावल्या. या दोघांना गेराल्ड कुत्सिया आणि ओटनील बार्टमन यांनी उत्तम साथ दिली. आयपीएल संघांना चांगल्या वेगवान गोलंदाजाची आवश्यकता आहे.

कुत्सिया आणि बार्टमन लिलावात अनसोल्ड गेले होते. कुत्सिया गुजरात टायटन्सकडून खेळला आहे. आयपीएल स्पर्धेत खेळण्याचा अनुभव त्याच्याकडे आहे. डअ२० स्पर्धेच्या यंदाच्या हंगामात बार्टमनने सर्वाधिक विकेट्स पटकावल्या होत्या. मात्र एवढे करूनही त्याला वर्ल्डकपसाठीच्या संघात स्थान मिळालं नाही. आयपीएल संघव्यवस्थापननांनी या दोघांच्या कामगिरीची नक्कीच दखल घेतली असेल.दरम्यान या विजयासह ५ सामन्यांची मालिका २–२ अशा स्थितीत आहे. पाचवा आणि अंतिम सामना २५ तारखेला ख्राईस्टचर्च इथे होणार आहे.

# सहकार चळवळीच्या माध्यमातून तरुणाईला व महिलांना काम देण्याचा प्रयत्न

## जिल्हा बँकेच्या किल्लारी शाखेचा प्रशस्त अत्याधुनिक इमारतीचा शानदार सोहळ्यात शुभारंभ संपन्न : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील






**लातूर/प्रतिनिधी :** देशातील तरुणाई व महिलांना सहकाराच्या माध्यमातून काम देण्याचा प्रयत्न सरकार करीत असून सेवा सोसायटी आता केवळ शेती विषयापुरते मर्यादित न राहता विविध प्रकारचे ५१ व्यवसाय या माध्यमातून उभा करता येतात यासाठी आता प्रयत्न होणे गरजेचे आहे असे मत राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले आहे. ते लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या किल्लारी येथील शाखेच्या प्रशस्त अत्याधुनिक इमारतीचे उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी सायंकाळी करण्यात आले याप्रसंगी ते बोलत होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुखसाहेब उपस्थित होते यावेळी लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन माजी आमदार धीरज विलासराव देशमुख प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते

यावेळी रेना साखर कारखान्याचे चेअरमन अनंतराव देशमुख, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले, लातूर बाजार समिती सभापती जगदीश बावणे, रेणा साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रवीण पाटील मारुतीचे व्हाईस चेअरमन सचिन पाटील माजी चेअरमन गणपतराव बाजुळगे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभय साळुंके,प्रदेश सचिव श्रीशैल उटगे, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील,कोंग्रेसचे जेष्ठ नेते शेषेराव पाटील, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव कार्यकारी संचालक हणमंत जाधव यांच्यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते .

सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यावेळी बोलताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की विजेच्या बाबतीत आता आपण स्वयंपूर्ण झालो आहोत राज्यातला शेतकरी हा विमान व हेलिकॉप्टर ला लागणारे इंधन लवकरच तयार करू शकेल अशा पद्धतीचे काम सहकार चळवळीच्या माध्यमातून आता आपल्याला भविष्यात करावयाचे आहे नवीन तंत्रज्ञान शेतीमध्ये करणे गरजेचे आहे. आता विषमुक्त शेतीकडे आपल्याला जावे लागणार आहे जमिनीचे माती परीक्षण व जमिनीचा पोत जमिनीत काय पिकवायचे याबाबतचे मार्गदर्शन आपल्याला नवीन हे आहे तंत्रज्ञानाकडून घेणे आवश्यक आहे सहकार चळवळीत आता चांगले लोक आले पाहिजे सरकार चळवळ टिकली पाहिजे उभी राहिली पाहिजे व वाढली पाहिजे यासाठी या चळवळीमध्ये चांगले लोक येणे गरजेचे आहे लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने लातूर जिल्ह्याला एक चांगली ओळख निर्माण करून दिली आहे जिल्ह्यातील साखर कारखानदारीमुळे राज्याला एक ओळख निर्माण झाली आहे बँकेच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकऱ्यांचा हित डोळ्यासमोर ठेवूनच निर्णय घेतलेले आहेत एका चांगल्या बँकेचा मी संचालक असून चांगल्या बँकेचा संचालक राज्याचा सहकार मंत्री झाला हे माझ्यासाठी अभिमानास्पद आहे परंतु याचे सर्व श्रेय राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना असून माझ्या मोठे होण्यामध्ये बँकेचा मोठा वाटा आहे मी जेव्हा इतर जिल्ह्यात जातो तेव्हा मी एका चांगल्या बँकेचा संचालक आहे असे अभिमानाने सांगत असतो. येणाऱ्या काळात बँकेच्या माध्यमातून या लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अधिक अधिक मदत कशी करता येईल यासाठी सरकार म्हणून मी संचालक मंडळाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार असल्याचे ग्वाही सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी यावेळी बोलताना दिली.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पुढे घेऊन जायचे असेल तर सर्वांना सोबत घेऊनच काम करावे लागते फक्त लातूर जिल्हाच नव्हे तर राज्यातील अन्य जिल्हा बँकांसाठी लातूर जिल्हा बँक ही एक आदर्श ठरणार आहे जिल्ह्याला पुढे घेऊन जायचे आहे यासाठी चांगली दृष्टी व चांगला विचार ठेवून काम केले तर विकास घडतो शेती संस्था जशा मजबूत होत आहेत तसेच जिल्हा बँकेच्या माध्यमातून पगारदार सहकारी संस्था सुद्धा सक्षम झाल्या आहेत गेल्या ४० वर्षाच्या कार्यकाळात जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाने नियमांमध्ये राहूनच परंतु माणुसकीचा विचार करून ताबडतोब सकारात्मक निर्णय घेतले आहेत याचा फायदा शेतकऱ्यांसोबतच लातूर जिल्ह्यातील व्यापाऱ्यांना अप्रत्यक्षरीत्या होत असतो यावर्षी जिल्ह्यात झालेल्या साखर कारखानदारीमुळे जवळपास दोन ते अडीच हजार कोटी रुपये लातूरच्या बाजारपेठेमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात फिरताना दिसत आहेत हे केवळ जिल्हा बँकेत चांगली लोकं आहेत . चांगला विचार घेऊन चालणारे संचालक मंडळ आहे म्हणूनच हे होऊ शकले येणाऱ्या काळामध्ये ही संस्था टिकली पाहिजे या संस्थेत चांगले लोक आले पाहिजेत यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे लातूर जिल्हा बँकेला राज्यात अव्वल स्थानावर घेऊन जाण्यासाठी सर्वांनी राजकारण बाजूला ठेवून सहकार्य करावे असे आवाहन सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी यावेळी बोलताना केले.

लातूर जिल्हा बँकेत स्थानिक भूमिपुत्रांना सहकार मंत्र्यांमुळे नोकर भरतीमध्ये संधी मिळाली असे सांगून लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने गेल्या ४० वर्षांमध्ये जिल्ह्याच्या शेतकऱ्यांच्या विकासाचे निर्णय घेतले असून गेल्या चार वर्षाच्या कारकिर्दीमध्ये बँकेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील आर्थिक शिस्त लावली आहे. लातूर जिल्हा बँकेत सध्या १२२ शाखा आहेत व २९ ठिकाणी स्वतःच्या मालकीचे जागेत स्वतंत्र शाखा इमारती आहेत आज बँकेत आठ हजार कोटी ची टर्नर असून ९०० कर्मचारी आहेत बँकेचा वाढता व्याप लक्षात घेता बँकेच्या आणखी शाखा वाढणे गरजेचे असून यासाठी सहकार मंत्र्यांनी शासनाकडे प्रयत्न करून लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखा वाढविण्यासाठी सहकार्य करावे . लातूर जिल्ह्यात शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज परतफेड वेळेवर करण्याची सवय येथील सभासदांना आहे नियमित कर्ज परतफ ेड करणाऱ्यांची संख्या लातूर जिल्ह्यात अधिक असल्याने नियमित कर्ज परतफेड करणारे अशा सभासदांना ५० हजार रुपये देण्याचे शासनाने मान्य केले असून ही मदत आणखीन वाढवण्यात यावी यासाठी सहकार मंत्र्यांनी शासन दरबारी आपला शब्द वापरावा असे आवाहन लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन धीरज देशमुख यांनी यावेळी बोलताना केले.

माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख व राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे लातूर जिल्ह्यातील सहकारातील, दो हंसो का जोडा असून राजकारण हे येथे फक्त निवडणुकांपुरतेच मर्यादित ठेवले जाते निवडणुका नंतर कुठलेही राजकीय मतभेद न ठेवता सहकारातून समृद्धी व सहकारातून स्वप्नपूर्ती व्हावी यासाठी नेते मंडळींनी आजवर मार्गदर्शन केलेले आहे नेते मंडळीच्या या मार्गदर्शना नुसारच यापुढील कालावधीत सुद्धा बँकेचे कामकाज शेतकऱ्यांचा विकास हाच केंद्रबिंदू ठेवून काम केले जाईल असा विश्वास यावेळी जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज देशमुख यांनी बोलताना व्यक्त केला.

यावेळी प्रास्ताविक संचालक अशोक गोविंदपुरकर यांनी केले तर सभेचे सूत्रसंचालन पीसी पाटील यांनी केले तर आभार बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव यांनी केले व्यासपिठावर जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव संचालक पृथ्वीराज सिरसाठ अशोक गोविंदपूरकर दिलीप पाटील नागराळकर जयेश माने, अनुप शेळके राजकुमार पाटील ,मारुती पांडे सौ स्वयंप्रभा पाटील सौ अनिता केंद्रे, श्रीमती भोसले ताई, कार्यकारी संचालक हणमंत जाधव, जिल्हा परीषद सदस्य पवार, दिपाली भोसले, सौ सई गोरे, तानाजी जाधव, सौ चव्हाण ताई , माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष नारायण लोखंडे, मारुती महाराज साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष उदयसिंह देशमुख, प्रकाश पाटील बालाजी साळुंके, कोंग्रेसचे समन्वयक सचिन दाताळ, बँकेचे मीडिया समन्वयक हरीराम कुलकर्णी, किल्लारी, लामजना, बेलकुंड, औसा ,खरोसा येथील सोसायटीचे चेअरमन, गटसचिव, सरपंच, शेतकरी सभासद, बँकेचे विविध खाते प्रमुख अधिकारी उपस्थित होते .

## माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त संत गोरोबा सोसायटी महिला मंडळाकडून स्वामी समर्थ महाराजांची आरती व अन्नदान

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लातुर शहरातील संत गोरोबा सोसायटी महिला मंडळाच्या वतीने श्री स्वामी समर्थ महाराजांची विधिवत पूजन करण्यात आले.

तसेच यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांना निरोगी दीर्घायुष्य,यशस्वी राजकीय कारकीर्द आणि अखंड जनसेवा त्यांच्या हस्ते घडत राहो अशी श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या चरणी मनोभावे प्रार्थना करण्यात आली.

दरम्यान या पवित्र प्रसंगी परिसरातील बाल गोपाळ, महिला भगिनी,नागरीक यांच्या समवेत अन्नदान उपक्रम राबवत आमदार अमित देशमुख यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करत अभिष्टचिंतन्यात आले.



# नवी दिल्लीत महापारेषणच्या डिजिटल स्टॉलला उत्स्फूर्त प्रतिसाद

## केंद्रीय ऊर्जामंत्री श्री. खट्टर, श्री. नाईक, राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर यांनी भेट देऊन केले कौतुक




नवी दिल्ली, दि. २१ : येथे आयोजित भारत इलेक्ट्रिसिटी परिषदेमध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) आकर्षक व पर्यावरणपूरक आधुनिक तंत्रज्ञान केंद्रित स्टॉलला अभ्यागतांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. केंद्रीय ऊर्जामंत्री श्री. मनोहरलाल खट्टर, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक तसेच महाराष्ट्राच्या ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी स्टॉलला भेट देत महापारेषणच्या कार्याचे कौतुक केले.

नवी दिल्लीतील यशोभूमी, व्दारका येथे भरविण्यात आलेल्या या चार दिवसीय परिषदेत महापारेषणने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित स्टॉल उभारला होता. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली, संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण आणि अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्टॉल साकारण्यात आला.

या स्टॉलमध्ये महापारेषणची प्रगती, ध्येय-उद्दिष्टे, तसेच भविष्यातील २०३० पर्यंतचे नियोजन याबाबत डिजिटल माध्यमातून माहिती सादर करण्यात आली. ड्रोन आणि मोबाईल ॲप तंत्रज्ञानाव्दारे पारेषण वाहिनी पेट्रोलिंग, एमटीएएमसी सबस्टेशन ऑटोमेशन प्रणाली यांसारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती अभ्यागतांना देण्यात आली. या स्टॉलला परिषदेत उल्लेखनीय भेटी मिळाल्या असून देश-विदेशातील प्रतिनिधींनी महापारेषणच्या तांत्रिक प्रगतीचे विशेष कौतुक केले.

**विविध मान्यवरांच्या भेटी**


महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. राधाकृष्णन बी., तेलंगणा साऊथ वीज वितरण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. जितेश पाटील, महापारेषणचे संचालक (संचलन) श्री सतीश चव्हाण तसेच महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे कार्यकारी संचालक श्री. शशांक जेवळीकर यांनी स्टॉलला भेट देऊन समाधान व्यक्त केले. तसेच आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रतिनिधींनीही स्टॉलला भेट देत महापारेषणच्या नवतंत्रज्ञानाची प्रशंसा केली.

## वडवळ ना.येथे जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे ४१ वे वार्षिक अधिवेशन; सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** वडवळ ना.येथील अमर ज्योती ग्रंथालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ आणि अमरज्योती ग्रंथालय वडवळ ना.च्या संयुक्त विद्यमाने,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे ४१ वे वार्षिक अधिवेशन शनिवार,दि.२८ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळात ग्रंथदिंडी, उदघाटन समारंभ, पुरस्कार वितरण परिसंवाद, खुलीचर्चा,ठराव वाचन आदि कार्यक्रमांनी तीन सत्रांमध्ये, वटसिध्दनागनाथ मंदिर,वडवळ ना.येथे आयोजित करण्यात आले असून,त्याचे उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे,अशी माहिती अमर ज्योती ग्रंथालयाचे अध्यक्ष तथा अधिवेशन स्वागताध्यक्ष वैजनाथअप्पा नंदागवळे यांनी दिली.

जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाच्या अधिवेशनाचा एक भाग म्हणून सकाळी ८ वाजता आयोजित ग्रंथ दिंडीचे पूजन विश्वासराव पाटील,गंगाधरअप्पा कल्याणे,राम मोतीपवळे,अशोकराव खोडवे यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर ग्रंथदिंडीप्रमुख संतोष आचवले, माणिकराव हालिंगे, सुरेश राजोळे व आनंद कापसे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही ग्रंथदिंडी ग्रंथालय ते वटसिध्द नागनाथ मंदिरापर्यंत काढण्यात येणारआहे.

सकाळी या अधिवेशनाचे उदघाटन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते,महराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या वेळी विशेष अतिथी म्हणून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत डॉ.नागोराव कुंभार आणि राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांची उपस्थिती लाभणार आहे.तर प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर देशमुख,राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील,कोषाध्यक्ष भिमराव पाटील,माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ.रामेश्वर पवार,मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक,कार्याध्यक्ष प्रभाकर कापसे,प्रमुख कार्यवाह राम मेकले,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष डॉ.ब्रिजमोहन झंवर, उपाध्यक्ष युवराज जाधव यांची उपस्थिती राहील.



यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते रवींद्र कालेकर यांना कै. ॲड.त्र्यंबकदास झंवर आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता राज्यस्तरीय पुरस्कार,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष हावगीराव बेरकीळे यांना जीवन गौरव पुरस्कार,किनगावच्या स्वामी विवेकानंद वाचनालयाचे अशोक मुंढे यांना कै.मारोती चिरके आदर्श ग्रंथपाल जिल्हास्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त धनंजय पवार व सूर्यकांत जाधव यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

दुपारी २ वाजता कर्मचारी समस्या व उपाय या विषयावर किरण बाबळसुरे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या दुसऱ्या सत्रात जहांगीर सय्यद व शादुल शेख हे विचार मांडणार आहेत. दुपारी ३ वाजता खुली चर्चा,ठराव वाचन व अधिवेशन समारोप सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांच्या अध्यक्षतेखाली होईल.यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर याचे प्रमुख मार्गदर्शन होणार आहे.विठ्ठल कटके हे ठरावाचे वाचन करतील.

तरी या अधिवेशनाला ग्रंथालय पदाधिकारी,कर्मचारी व साहित्य प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अमरज्योती ग्रंथालयाचे सचिव वसंत बेरकीळे,उपाध्यक्ष विश्वनाथ भेटे,सहसचिव शिवाजी कल्याणे,कोषाध्यक्ष दिगंबर भेंडे,संचालक विश्वासराव पाटील,सिद्रामप्पा आचवले, संभाजी बेरुळे,मनिषा महाजन,सुवासिनी यमपल्ले,सेवक दत्ता कांबळे, जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे सहकार्यवाह काशीनाथ बोडके,संचालक सूर्यकांत शिरसे,गुप्तलिंग स्वामी,नंदकुमार घोगरे, अनिल पाटील, बाळकृष्ण होळीकर,श्रीधर स्वामी, काशीनाथ साहू,तुकाराम सुगावकर, बालाजी सुर्यवंशी,गोकर्णा जाधव, राजकुमार सोनी, नागनाथ बिरादार, रामचंद्र तिरुके, डॉ.अमित म्हेत्रे व संयोजन समितीचे वैभव पाटील,दयानंद पाटील, दिगंबर भेंडे,संभाजी बेरुळे, ज्ञानेश्वर बेरकीळे, गंगाधर यवंदगे, मुरलीधर सोनकांबळे, बालाजी गंदगे, उमाकांत आचवले,सांगर नवणे, विवेकानंद पाटील,नागनाथ बेंडके,उमाकांत लव्हराळे, माहदेव भेटे, गंगाधर कल्याणे,भरतसिंह ठाकूर,संभाजी रेकुळगे,धनश्री मॅडम, मीना देवकते,प्रकाश बेरुळे, विश्वनाथ बेंडके,काशिनाथ रेड्डी,श्रीधर बेरकीळे,सतीष सांगवे,महादेव खिचडे इत्यादींनी केले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



## एच.पी.व्ही. लसीकरण मोहिमेचे बापुराव पाटील यांच्या हस्ते उदघाट्न..

### गर्भाशयाच्या मुखाला होणाऱ्या कर्करोगला रोखण्यासाठी लसीचे मदत होते - डॉ. महेश अर्धाल



मुरूम (डॉ. रामलिंग पुराणे ) येथील ग्रामीण रुग्णालयात दि. २० वार शुक्रवार रोजी व्क्षत लसीकरण मोहिमेचे मुरूम नगरीचे नगराध्यक्ष बापुराव पाटील यांच्या हस्ते आरोग्य देवता धनवंत्री पूजन व द्विप्रज्वलनाने उदघाटन संपन्न झाले.याप्रसंगी उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण,पंचायत समिती माजी सभापती मदन पाटील, गोविंद पाटील, माजी नगराध्यक्ष बबन बनसोडे,नगरसेवक गणेश अंबर,नगरसेवक अजित चौधरी,वैधकीय अधीक्षक डॉ. महेश अर्धाले,डॉ. शिवराज कारडामे, डॉ. नितीन डागा, डॉ. महेश जिरोळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी माहिती देताना डॉ. अर्धाले म्हणाले व्क्षत लस सण २०१० पासुनच वापरात असून त्या लसीपासून कोणतेही धोका नसून त्याबाबत समाजमाध्यमावर अफवा पसरविण्यात येत आहेत. गर्भशयाच्या मुखाला होणाऱ्या कर्करोगाला थांबविण्यासाठी या लसीचे मदत होते. व्क्षत ही मानवी पॅपिलोमाव्हायरस संसर्गापासुन संरक्षण करणारी एक अत्यंत सुरक्षित आणि प्रभावी लस आहे, जी प्रामुख्याने गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगास कारणीभूत ठरू शकते. १४ ते १५ वयोगटातील मुलींसाठी ही लस सर्वोत्तम मानली जाते. ही लस लैंगिक क्रिया सुरु होण्यापूर्वी घेतल्यास सर्वाधिक संरक्षण मिळते. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून बचावासाठी हा एक अत्यंत महत्वाचा प्रतिबंधात्मक उपाय असल्याचे माहिती लसी संदर्भात मनामध्ये कसलीही शंका न बाळगता लसीकरण करून घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी नगराध्यक्ष बापुराव पाटील यांनी ग्रामीण रुग्णालयातील डायलसिस सेंटर, रुग्णालयाची पाहणी केली.मुरूम शहरातील डॉक्टर असोसिएशन, पत्रकार बांधव, ग्रामीण रुग्णालय कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजित जाधव तर आभार विजय भोसले यांनी मानले.

# पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत उध्दव वय ६० वर्षे, रा. चोराखळी ता. कळंब जि. धाराशिव हे दि.२०.०३.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोर पत्राचे शेडसमोर चोराखळी येथे अंदाजे ३,८०० किंमतीची ३५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर नारायण वय ३० वर्षे, रा. तेरखेडा ता. वाशी जि. धाराशिव हे दि.२०.०३.२०२६ रोजी मुजावर यांचे गाळ्यासमोर तेरखेडा येथे अंदाजे ३,५०० किंमतीची ३४ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर सुगंधा रा. सापनाई शिवार शेत गट नं २८२ ता.कळंब जि. धाराशिव या दि.२०.०३.२०२६ रोजी एनएच ५२ रोडवर सापनाई गावाकडे जाणारे रोडचे बाजूस शेत गट नं २८२ मध्ये राहत असलेले पत्राचे शेडचे बाजूस अंदाजे १६,८०० किंमतीची ७ लिटर गावठी दारु व २०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये येरमाळा पो ठाणे येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदविले आहेत.

परंडा पोलीस ठाणे अंतर्गत आलताफ वय २९ वर्षे, रा. एच नं १६११/१६९ ओझ्र ता. कांडेलिम बादेश जि नॉर्थ गोवा राज्य गोवा, अमोल वय ३२ वर्षे, रा. कवठाळ ता. चिखली जि. बुलढाण ह.मु. निअर ओटेली कुंब, आरंभु ता. पेरनेम जि. बारदेस राज्य गोवा, महेश वय ३० वर्षे, रा. फस्ट मेन, सेकंड क्रॉस नागेंद्रमट्टी ता. जि. हवेरी राज्य कर्नाटक हे दि.२०.०३.२०२६ रोजी परंडा ते कुर्डुवाडी जाणारे रोडवर सटवाई देवीचे मंदीराजवळ आवारपिंपरी शिवार येथे अंदाजे १,२०,००० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ६०० बाटल्या इनोव्हा कार असे एकुण १६,२०,०००किंमतीचा माल अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेला जप्त करण्यात आला. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

## आठ दिवसांत पथकाकडून ९३ ठिकाणी छापा : सिलिंडरसाठी गर्दीवर उतारा



धाराशिव(प्रतिनिधी)-आखाती देशातील युध्दाचा गॅस पुरवठ्यावर परिणाम झालेला आहे. व्यवसायिक सिलिंडर बंद करण्यात आलेले आहेत. घरगुती गॅस सिलिंडरचा वापर व्यवसायात केला जाऊ नये यासाठी तालुकास्तरावर ८ पथके नेमण्यात आली आहेत. मागील आठ दिवसात पथकाने ९३ ठिकाणी तपासणी केली आहे. वाशीत एकाच ठिकाणी १५ टाक्या आढळून आल्या होत्या. मात्र, त्या टाक्या कोणाच्या याचा प्रशासनास अद्यापही थांगपत्ता लागलेला नाही. त्यामुळे गुन्हाही दाखल झालेला नाही.

शहरी भागातील गॅसधारकांना २५ दिवसांनी तर ग्रामीण भागातील नागरिकांना ४५ दिवसाला सिलिंडर देण्याचा नियमही घालण्यात आला आहे. असले तरी गॅस एजन्सीसमोर नागरिकांचा रांगा कायम आहेत. बुधवारी रात्री धाराशिव शहरातील दोन हॉटेलात घरगुती गॅस टाक्या आढळून आल्याने हॉटेल व्यवसायिकांविरुद्ध गुन्हे दाखल केलेले आहेत. जिल्ह्यात २७ पैकी २६ गॅस एजन्सी सक्रीय आहेत. उज्वला योजना व योजना व्यतिरिक्त असे सुमारे ४ लाखाच्या घरात गॅसचे ग्राहक आहेत. ग्रामीण भागातील लाभार्थींना ४५ दिवसाची गॅस वापराची मर्यादा दिली आहे.

## अवैध मद्य जप्त करून पोलिसात गुन्हा दाखल

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फातीमा वय ४८ वर्षे, रा. कोंड ता. जि. धाराशिव हे दि.२०.०३.२०२६ रोजी आपल्या राहते घरासमोर अंदाजे ५,००० किंमतीची ५० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये ढोकी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## उमरग्यातील विद्यार्थ्यांनी दिली महादेव मंदिरास भेट, ऐतिहासिक स्थळांच्या संवर्धन व जतनाविषयी मार्गदर्शन



उमरगा(प्रतिनिधी)-श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या मार्फत ऐतिहासिक स्थळांचे जतन व संवर्धन या उपक्रमांतर्गत उमरग्यातील प्रसिद्ध चालुक्यकालीन श्री महादेव मंदिरास विद्यार्थ्यासह क्षेत्रभेट देऊन चालुक्य शैलीच्या मंदिर स्थापत्याचा अभ्यास करण्यात आला.

चालुक्य शैलीच्या मंदिर स्थापत्य ची माहिती इतिहास विभाग प्रमुख डॉ. गिरीधर सोमवंशी यांनी विद्यार्थ्यांना दिली तर उमरगा परिसरातील इतिहासाची माहिती प्रा. डॉ. बी. जी. माने यांनी विद्यार्थ्यांना दिली. यावेळी प्रा. पी. एस. बनसोडे, प्रा. एस. बी. जाधव व इतिहास विभागाचे पदवी व पदव्युत्तर शिकणारी विद्यार्थी उपस्थित होते.

उमरगा महादेव मंदिर कल्याण चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा (इस १०७६ ते इस ११२६) यांच्या काळात कारकिर्दीत बांधले असावे.मंदिर पूर्वाभिमुख असून गर्भगृह अंतराळ, मध्यमंडप व मूकमंडप अशा रचनेचे,तीन गर्भगृह असलेले त्रिदल पद्धतीचे एका उंच चौथ्यावर (जगती) हे उभारलेले मंदिर आहे. या मंदिरात विष्णू, महेश व ब्रह्मा अशा तिन्हीदेवतांचे स्वतंत्र गर्भगृह आहे पूर्वाभिमुख गर्भगृह विष्णूचे असून त्यात विष्णू मूर्ती आहे. त्याच्यासमोरच नंतरच्या काळातील शिवलिंग आहे. याच गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावर दोन्ही बाजूस सुंदर व मोहक अशा सुरसुंदरी (देवांगना) शिल्प कोरली आहे. दक्षिणाभिमुख गर्भ गृहात तीन फूट उंच व दोन फूट रुंदीची ब्रह्माची मूर्ती आहे. तर उत्तराभिमुख गर्भगृहात बाणलिंग शिवलिंग आहे. गर्भगृहाचे प्रवेशद्वारा वरती तांडव नृत्य करणाऱ्या नटराजाची प्रतिमा कोरली आहे. तुळजाई मातेच्या नावाने उमरगा म्हणून नामांतर निजाम राजवटीत उमरिया सरदाराचे ताब्यात शहर गेल्यामुळे शहराचे नाव उमरगा हे पडले अशी अख्यायिका आहे परंतु यात काही तथ्य असावे असे वाटत नाही कारण यात कोणताही स्पष्ट पुरावा उपलब्ध नाही तसेच तुळजापूरची देवी तुळजाभवानी याचे दुसरे नाव उमा देवी आहे.

कर्नाटक व आंध्रातील लोकांना तुळजापूर कडे जाणारा मार्ग या परिसरातून जातो म्हणून या परिसराला उमा मार्ग म्हणून संबोधले जाते. या शहराचे नामकरण उमरगा असे झाले.अशी दुसरी आख्यायिका सांगितली जाते.

## धाराशिवमधील पाणी प्रकल्पात ५४% उपयुक्त जलसाठा

धाराशिव (प्रतिनिधी)- यंदाच्या मान्सूनमध्ये झालेल्या रेकॉर्डब्रेक पावसामुळे धाराशिव परिसरातील पाणी प्रकल्पांना भरपूर पाणीसाठा लाभला आहे. मार्च महिन्यापर्यंत प्रकल्पांमध्ये सध्या ५४ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून, २२६ पैकी फक्त १ प्रकल्प कोरडा आहे. उर्वरित प्रकल्पांमध्ये पाणीसाठा समाधानकारक स्थितीत आहे. उन्हामुळे पाण्याचा वापर अन् बाष्पीभवन वाढले तरी प्रकल्पातील पाणी ऑगस्टपर्यंत पुरणार आहे.

दरवर्षी डिसेंबर महिन्यापासून शेती पिकांना पाणी देण्यासाठी प्रकल्पातून पाण्याचा उपसा वाढतो. ज्या वर्षी कमी पाऊसकाळ असायचा, त्या वर्षी डिसेंबरपासून प्रकल्पातही पाण्याची पातळी खालावू लागत. मार्चपासून टंचाईच्या झळा सहन कराव्या लागत. एप्रिल व मे महिन्यात टंचाईच्या झळा तीव्र होऊ लागताच प्रशासनाला अधिग्रहण व टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागायचा. कमी पाण्यामुळे रब्बी हंगामातील पिकांना फटका बसायला. परिणामी, उत्पादनात घट येण्याची शक्यता अधिक असायची. मात्र, यंदा मान्सूनमध्ये चार महिने व अगोदरचा एक व नंतरचा एक असे सहा महिने पाऊसकाळ राहिला. पावसाळ्यात सर्वच प्रकल्प ओव्हरफ्लो झाले होते. मार्च महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यातही २२६ प्रकल्पापैकी केवळ १ प्रकल्प कोरडा पडला आहे. उर्वरित प्रकल्पात चांगला पाणीसाठा आहे. सध्या ५४ टक्के उपयुक्त पाणीसाठा असल्याने उन्हाळ्यात नागरिकांना टंचाईचा सामना करावा लागणार नाही. मुबलक पाणी साठ्यामुळे शेतकरी फळभाज्या लागवडीकडे वळू लागले आहेत. जिल्ह्यातील २२६ प्रकल्पाची साठवण क्षमता ७२८.८०१ दलघमी इतकी आहे. गतवर्षी मार्च अखेरीस प्रकल्पात २९०.२६३ दलघमी इतका पाणीसाठा शिल्लक होता. त्याची टक्केवारी ३९ टक्के एवढी होती. यंदा प्रकल्पात ३९७.३ दलघमी पाणीसाठा आहे. त्याची टक्केवारी ५४ टक्के आहे. त्यामुळे यंदा या पाण्याचे नियोजन केल्यास उन्हाळ्यात पाणी टंचाई जाणवणार नाही .

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

## तुळजापुरात रस्त्यावर भरतोय बाजार, विक्रेत्यांमुळे वाहतूक कोंडी नित्याचीच

तुळजापूर भाजी विक्रेत्यांनी चक्क रस्त्यावरच भाजी विक्री सुरू केल्याचा प्रकार बसस्थानक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक रस्त्यावर सुरू आहे. यामुळे या रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे. मात्र या प्रकाराकडे पालिकेचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

शहरातील वर्दळीचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते बसस्थानक या रस्त्यावर भाजी विक्री सुरू आहे. दुपारनंतर या रस्त्याचा मधोमध भाजी विक्रेते बसत असल्याने रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे. सायंकाळ चा सुमारास भाजी खरेदी साठी नागरिकांची गर्दी होत असल्याने रस्ता जाम होत आहे. भाजी खरेदीसाठी आलेले नागरीक रस्त्यावरच दुचाकी लावत असल्याने वाहतूकीस अडथळा निर्माण होत आहे. मात्र या प्रकाराकडे पालिकेसह पोलीस दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांसह भाविकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

तुळजापुरात आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी राज्य आणि देशभरातून भाविक मोठ्या संख्येने येतात. याच रस्त्याने भाविक दर्शनासाठी जातात. या मार्गावरच विक्रेते रस्त्याच्या मधोमध बसत असल्याने भाविकांच्या वाहनांना व भाविकांना या मार्गावरून जाता येत नाही. याच मार्गावर पुढे विक्रेत्यांची गर्दी असल्याने भाविकांना देवीच्या दर्शनाला जाण्यासाठी अडथळ्याची शर्यत पार करतच जावे लागते. यावर पालिकेने तोडगा काढून भाविकांची सोय करून द्यावी अशी मागणी होत आहे.

बॅरिकेडिंग गायब; वन वे कागदावरच शहरातील बसस्थानक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजीमहाराज चौक ते दीपक चौक या मार्गावर बॅरिकेटिंग लावून वन वे करण्यात आले होते. मात्र गेल्या काही महिन्यापासून रस्त्यावरील बॅरिकेटिंग गायब झाली असून, यामुळे या मार्गावर सातत्याने वाहतूक कोंडीची समस्या उद्भवत आहे

## ३० नवागतांच्या पायांचे ठसे घेत शाळेत प्रवेश

खामसवाडी--कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गुढीपाडवा निमित्त गुढीपाडवा प्रवेश वाढवा अभियान अंतर्गत भव्य प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत आनंददायी व उत्साही वातावरणात करण्यात आले. पहिल्याच दिवशी ३० नव्या विद्यार्थ्यांची नोंद करण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या पायांचे ठसे घेऊन त्यांच्या शाळेतील पहिल्या पावलाची आठवण जतन करण्यात आली. हा अनोखा उपक्रम उपस्थितांच्या मनाला भावला. गुढीपाडव्याच्या मंगलमय निमित्ताने प्रवेशासाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे फेटे, साखरेचे हार, फुगे व फुलांनी मान्यवरांच्या हस्ते उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य विश्वास कोकणे, पंचायत समिती सदस्या सुवर्णा पाटील, सरपंच अमोल पाटील, उपसरपंच दयानंद पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजकुमार शेळके, उपाध्यक्ष श्रीनिवास झोरी, तसेच सदस्य महेश शेळके, ईश्वर डोईफोडे, वाजिद आत्तार, गावातील शिक्षणप्रेमी नागरिक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक पंकज मोरे, शिवराज बकले, नागनाथ शेळके व सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल उत्साह या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल उत्साह निर्माण झाला असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सकारात्मक पाऊल उचलण्यात आले आहे. पहिल्याच दिवशी ३० नव्या विद्यार्थ्यांची नोंद करण्यात आली. सध्या ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे कल वाढत असताना, गावचे लोकनियुक्त सरपंच अमोल पाटील यांनी आपल्या पाल्याचा प्रवेश जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत करून आज त्याला शाळेत पाठवून आदर्श घालून दिला.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649